सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.४ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## देशातील प्रत्येक पंचायतीमध्ये २०२९ सालापर्यंत सहकारी संस्था असेल - अमित शाह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चंदीगड**

गेल्या चार वर्षांमध्ये सहकार मंत्रालयाने देशातील सर्व राज्य सरकारांच्या सहकायनि सहकार क्षेत्राचा पाया मजबूत करण्याचे काम केले आहे. २०२९ सालापर्यंत देशातील प्रत्येक पंचायतीमध्ये सहकारी संस्था असेल, असा विश्वास केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला. ते हरियाणामधील रोहतक येथे साबर डेरी प्लांटचे उद्घाटन प्रसंगी बोलत होते.




अमित शाह म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत भारताच्या दुग्धव्यवसाय क्षेत्राने ७० टक्के वाढ नोंदवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताचे डेअरी क्षेत्र जगातील सर्वात वेगाने विकसित होणारे दुग्धोत्पादन क्षेत्र बनले आहे. ते म्हणाले की, २०१४-१५ मध्ये भारतातील दुभत्या जनावरांची संख्या ८६ दशलक्ष होती, त्यामध्ये वाढ होऊन आता ती ११२ दशलक्ष वर पोहोचली आहे. त्याचप्रमाणे दूध उत्पादन १४६ दशलक्ष टन वरून २३९ दशलक्ष टन वर पोहोचले आहे. ते पुढे म्हणाले की, आपल्या देशातील शेतकऱ्यांनी भारतातील दरडोई दुधाची उपलब्धता १२४ ग्रॅमवरून ४७१ ग्रॅमपर्यंत वाढवली आहे. केंद्रीय सहकार मंत्री म्हणाले की, गेल्या ११ वर्षांत भारताच्या दुग्धव्यवसाय क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत, त्यामुळे आपल्या शेतकऱ्यांना समृद्धी लाभली आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळातील सातत्यपूर्ण धोरणांमुळे आज भारत जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश म्हणून अभिमानाने उभा आहे, असे त्यांनी सांगितले. आपली सध्याची दुधावर प्रक्रिया करण्याची क्षमता दिवसाला ६६० लाख लिटर आहे आणि २०२८-२९ पर्यंत ही क्षमता १०० दशलक्ष लिटरपर्यंत वाढवण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे, असे त्यांनी नमूद केले. एकदा हे छोय साध्य झाले की, सर्व नफ्याचा थेट लाभ दूध उत्पादन करणाऱ्या आपल्या शेतकरी माता भगिनींना मिळेल, असे ते म्हणाले अमित शाह म्हणाले की, अलिकडेच मोदी सरकारने पशुखाद्य उत्पादन, खत व्यवस्थापन आणि मृत प्राण्यांच्या अवशेषांचा वापर चक्राकार अर्थव्यवस्थेत करण्यासाठी तीन राष्ट्रीय सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत.

अमित शाह म्हणाले की, आज, साबर डेअरीच्या माध्यमातून, देशातील दूध उत्पादकांच्या कल्याणासाठी सुमारे ३५० कोटी रुपये खर्चाचा दहीं, ताक आणि योगर्ट उत्पादनाचा देशातील सर्वात मोठा प्लांट, बांधून पूर्ण झाला आहे. साबर प्लॉटमध्ये दररोज १५० मेट्रिक टन दही, १० मेट्रिक टन योगर्ट, ३ लाख लिटर ताक आणि १०,००० किलो मिठाईचे उत्पादन केले जाईल, ज्याद्वारे शेतक-यांच्या समृद्धीचा मार्ग मोकळा होईल, ते पुढे म्हणाले की, आज साबर डेअरी राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र, पंजाब, उत्तर प्रदेश आणि बिहारमधील शेतक-यांना सेवा देत आहे.

## कफ सिरपमध्ये ऑईल सॉल्वेंटचा संशय, बायोप्सी रिपोर्टमध्ये विषारी पदार्थ सापडल्याचा डॉक्टरांचा दावा

### गेल्या ३० दिवसांत मृतांची संख्या पोहचली नऊ वर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ छिंदवाडा**

मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात किडनी फेल झाल्यामुळे मुलांच्या मृत्यूचं सत्र सुरूच आहे. गेल्या ३० दिवसांत मृतांची संख्या नऊ झाली असल्याने आरोग्य विभागात खळबळ उडाली. कफ सिरपमध्ये ऑईल सॉल्वेंटचा संशय आहे.बुधवारी नागपूरमध्ये उपचारादरम्यान आणखी एका मुलाचा मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, ४ सप्टेंबर रोजी पहिला मृत्यू झाला आणि एका महिन्यात नऊ मुलांना आपला जीव गमावला आहे. या गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, आरोग्य विभाग आणि प्रशासन सक्रियपणे काम करत आहे.




परासियाचे उपजिल्हाधिकारी सौरभ कुमार यादव यांनी सांगितलं की, आतापर्यंत १,४०० मुलांची तपासणी करण्यात आली आहे आणि ही मोहीम सुरू आहे. संभाव्य रुग्णांची लवकर ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्यावर उपचार करण्यासाठी दररोज १२० मुलांची तपासणी केली जात आहे. परासिया परिसरात व्हायरल तापाच्या प्राथमिक उपचारानंतर, मुलांना छिंदवाडा येथे रेफर करण्यात आलं, जिथे त्यांना गंभीर किडनी इन्फेक्शन असल्याचें निदान झालं. नंतर त्यांना नागपूर येथे रेफर करण्यात आले, जिथे एकामागून एक नऊ मुलांचा मृत्यू झाला.

**किडनी 'विषारी पदार्थामुळे' फेल**

शिवम, विधी, अदनान, उसैद, ऋषिका, हेतांश, विकास, चंचलेश आणि संध्या अशी मुलांची नावं आहेत. भोपाळ येथील एनएचएमचे वरिष्ठ सहसंचालक डॉ. प्रभाकर तिवारी म्हणाले, सिरपचे नमुने घेण्यात आले आहेत, परंतु निकाल अद्याप प्रलंबित आहेत. मृत मुलांच्या बायोप्सी रिपोर्टमध्ये स्पष्टपणे दिसून येतं की त्यांची किडनी 'विषारी पदार्थामुळे' फेल झाली. हा पदार्थ कफ सिरपमध्ये होता की आणखी काही हा तपासाचा विषय आहे. डायथिलीन ग्लायकोल (डीईजी) हा औद्योगिक पदार्थ असल्याचं वारंवार सांगितलं जातं. जर ते सिरपमध्ये असेल तर ते अत्यंत धोकादायक आहे.

## मी गद्दार, नमकहराम, हरामखोरांना उत्तर देत नाही

### उद्धव ठाकरेंनी रामदास कदम यांच्या टीकेला उत्तर देणे टाळले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

उद्धव ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पार्थिवाचा दोन दिवस छळ केल्याचा आरोप शिंदेसेनेचे नेते रामदास कदम यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. हे खरे की खोटे हे कळण्यासाठी उद्धव यांची नार्को टेस्ट करा, अशी मागणीही त्यांनी केली. कदमांच्या आरोपामुळे उद्धवसेनेचे नेते आक्रमक झाले आहेत. याच दरम्यान आता बाळासाहेबांच्या पार्थिवावरून रामदास कदम यांनी केलेल्या आरोपावर उद्धव ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे.

मी गद्दार आणि नमकहरामांना उत्तर देत नाही. तो माणूस गद्दार आणि नमकहराम आहे. उत्तर देण्याची मला गरज नाही. कारण ठाकरे म्हणजे काय आहे हे अख्खा महाराष्ट्र आणि देश ओळखतो. त्यामुळे गद्दार आणि हरामखोरांना उत्तर देत नाही असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. तसेच ज्यांनी माझा पक्ष चोरला, निशाणी चोरली, वडील चोरले त्यांचं कसलं मेरिट आहे. हा अन्याय आहे. निवडणूक आयोगाला कोणत्याही पक्षाचं नाव




अचलून दुसऱ्यांना देण्याचा अधिकार नाही.

माझा पक्ष हा शिवसेनाच आहे, शिवसेनाच होता आणि शिवसेनाच राहिल. मी निवडणूक आयोगाचं, आयुक्ताचं नाव हे धोंड्या ठेवलं होतं. आता तो धोंड्या गेल्या... तो कुठे गेला हे माहीत नाही. आता नवीन बोंड्या आला असेल. तो माझ्या पक्षाचं नाव बदलू शकत नाही. कारण माझ्या पक्षाचं नाव हे आजोबांनी आणि वडिलांनी ठेवलं आहे. निवडणूक आयुक्त तेव्हा जन्माला पण आले नव्हते असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## एकाच दिवशी ४०० जणांना नियुक्तीचे आदेश

### अनुकंपा, एमपीएससीतील उमेदवारांना नियुक्तीपत्रे; लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांनी दिल्या शुभेच्छा





**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार अनुकंपा तत्त्वावरील उमेदवारांची नियुक्ती आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड करण्यात आलेल्या लिपिक-टंकलेखक पदावरील ४०० उमेदवारांना आज एकाच दिवशी नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. संत ज्ञानेश्वर सभागृहात हा भावपूर्ण कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या हस्ते



निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी अशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, वनसंरक्षक अर्जुना के. आर., आदिवासी विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी, पोलिस उपायुक्त रमेश धुमाळ आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्रीमती सिंघल यांनी, शासनाने अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचे नियम सोपे केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर यातील नियुक्ती करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्ह्यात साधारणतः ४०० जणांना, तर अमरावती विभागात ११०० उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती होण्यासाठी सर्व विभागांनी सकारात्मक दृष्टिकोन बाळगला. तसेच सक्रीय योगदान दिल्यामुळे नियुक्त्या करणे सफल झाले आहे. अनुकंपा तत्त्वावरील उमेदवार चांगल्या पद्धतीने लोकाभिमुख कामे करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, शासनाने दीडशे दिवसाच्या उपक्रमांमध्ये अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती हा उपक्रम घेतल्याने असंख्य उमेदवारांना फायदा झाला आहे. अनुकंपा तत्वांमध्ये दावा करण्यासाठी आता तीन वर्षे मुदत आणि उमेदवार बदलण्याची सोय देण्यात आली आहे. त्यामुळे अधिकाधिक उमेदवार पात्र ठरले आहेत. शासन सेवेत आल्यानंतर आता प्रत्येकाने कर्तव्याप्रति संवेदनशील राहावे. एक चांगला अधिकारी म्हणून जबाबदारी स्वीकारावी. नियुक्तीनंतर संवेदनशीलपणे कार्य करून पुढे जावे, असे सांगितले.यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, प्रवीण तायडे यांनी शासन सेवेत नियुक्ती झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुंबई येथील राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले यावेळी वन विभागात नवनियुक्त कर्मचारी ज्योती कोरडे आणि पोलीस विभागातील धनश्री टेकाम यांनी मनोगत व्यक्त केले. निरीक्षण अधिकारी चैताली यादव यांनी सूत्रसंचालन केले निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी आभार मानले.

## आम्ही युती-आघाडीचे बळी ठरलो, आता स्थानिकांच्या भावना लक्षात घेणार; उद्धव ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

मी कुणाला शत्रू मानत नाही. मोदींनाही मानत नाही. ते मानत असतील तर माहिती नाही. देवेंद्र फडणवीस यांना विरोधक म्हणून बोलत नाही. फडणवीस हतबल झालेत. कशामुळे हतबल आहेत माहिती नाही. त्यांच्याकडे पाशवी बहुमत आहे. एवढ्या वर्षानंतर बहुमत आहे. केंद्र सरकार त्यांच्या पाठीशी आहे. एवढे पाठबळ असलेला मुख्यमंत्री एवढा हतबल का हे माहिती नाही. याचे कारण म्हणजे खुले आम भ्रष्टाचार सुरू आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.



उद्धव ठाकरे पत्रकारांशी बोलत होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढणार का, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांना विचारण्यात आला होता. हा प्रश्न तीनही पक्षांनी सोडवायला हवा. लोकसभा आणि विधानसभा एकत्र लढलो. तिन्ही पक्षाने एकत्र लढले पाहिजे. तिन्ही पक्षांना वाटले एकत्र लढायचे, तर लढू शकतो. पण कुणाला वाटले स्वतंत्र लढायचे तर तसे होऊ शकते. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे त्या स्थानिक नेते पदाधिकार्यांच्या भावनाही समजून घेऊ, अशी ग्वाही उद्धव ठाकरे यांनी दिली.

## दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता लागू होईल निवडणुकीच्या तयारीला लागू या - चंद्रकांत दादा पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४पुणे**

महाराष्ट्रात आता लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात आता चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर तंत्र व उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू, असे त्यांनी म्हटले आहे.



चंद्रकांत पाटील म्हणाले, लोकसभा, विधान सभेपेक्षा नेत्याची खरी निवडणूक ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका असते. लोकशाहीमधील सर्वात महत्त्वाची ही निवडणूक आहे. कदाचित आज (४ ऑक्टोबर) संध्याकाळपर्यंत जिल्हा परिषद निवडणुकीची घोषणा होईल. आता कुणीतरी म्हणतील निवडणूक आयोगाशी दादांची चर्चा झाली वाटते. मी ४० वर्षे यामध्ये घालवली त्यामुळे मी अंदाज मांडला आहे. दिवाळीनंतर दोन दिवसात आचारसंहिता जाहीर होईल, त्यामुळे आपण निवडणुकीच्या तयारीला लागू या, असे त्यांनी म्हटले आहे. भाजपच्या विजयी संकल्प मेळाव्यात ते बोलत होते.

पुढे बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, २०१९ साली ज्यांचे तिकीट नाकारले त्या बावनकुळे यांना २०२४ च्या विधानसभा निवडणुकीचे उमेदवार ठरवण्याचे अधिकार मिळाले. निवडणूक ही फास्ट ट्रेन प्रमाणे आहे, प्लॅटफॉर्मवर जो राहील तो राहील. मात्र, नाराज होऊ नका. राजकारणात प्रयत्नाबरोबरच नशीब देखील लागते असेही ते म्हणालेत.

## नृत्याच्या 'बिजली'च्या पैंजणांचा आवाज थांबला..!

### ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे निधन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपल्या अप्रतिम अभिनय आणि नृत्यकौशल्याने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या ९४ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे सिनेइंडस्ट्रीवर शोककळा पसरली आहे. संध्या या सुप्रसिद्ध दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या तिसऱ्या पत्नी होत्या.

राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री



ॲड.आशिष शेलार यांनी ट्विट करून ज्येष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांच्या निधनाची माहिती शेअर केली. त्यांनी लिहिले की, भावपूर्ण श्रद्धांजली! पिंजरा चित्रपटातील प्रसिद्ध अभिनेत्री संध्या शांताराम जी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आहे. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांनी आपल्या अप्रतिम अभिनय आणि नृत्यकौशल्याने प्रेक्षकांच्या मानावर एक वेगळी छाप पाडली. 'झनक झनक पायल बाजे', 'दो आंखें बारह हाथ' आणि विशेषतः 'पिंजरा' चित्रपटामधील त्यांची अजरामर भूमिका प्रेक्षकांच्या मनात कायम स्मरणात राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो!

## संपादकीय ......

# सेमिकंडक्टर चिप निर्मितीतला स्वदेशी विक्रम!

अनेकांना कदाचित आठवत असेल की कोरोना-१९ काळात काही इलेट्रॉनिक उपकरणं महागली होती, ऑटोमोबाईल इंडस्ट्री ठप्प झाली होती आणि स्मार्टफोन्सचे प्रॉडक्ट लॉन्चही रखडले होते. हे सर्वकाही सेमिकंडक्टर चिप्सचं उत्पादन थंडावल्यामुळं झालं होतं. आपल्या घरातला टीव्ही, फ्रिज, होम अप्लायन्सेस, दुचाकी-चारचाकी, स्मार्टफोन्स, कम्प्युटर्स, लॅपटॉप असोत किंवा सुरक्षा व अवकाश उपकरणं असोत सर्वकाही सेमिकंडक्टर चिप्सवर चालतात. एवढंच काय तर ही इलेक्ट्रॉनिक उपकरणं खरेदी करण्यासाठी आपण ज्या डेबिट/क्रेडिट कार्डाचा वापर करतो, ते कार्डही एका चिपवरच चालतं. या चिप्सना प्रोसेसर असंही म्हटलं जातं. या चिप्स इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा मेंदू म्हणून काम करतात.

एकावेळेला ३२ बिट डेटा प्रोसेस करण्याची क्षमता असलेली विक्रम ३२ बिट चिप ही भारताची पहिली स्वदेशी सेमिकंडक्टर चिप. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) मोहालीतील सेमिकंडक्टर लॅबमध्ये संरक्षण आणि एअरोस्पेस उपकरणांना डोळ्यापुढं ठेवून या प्रोसेसरचं डिझाईन करण्यात आलंय. हा प्रोसेसर विक्रम १६०१ चं ॲडव्हान्स व्हर्जन आहे. इस्रोच्या वेगवेगळ्या रॉकेटमध्ये २००९ पासून हा प्रोसेसर वापरला जात होता. याचं पहिलं व्हर्जन १६ बिट एवढं होतं, तर आताचं ॲडव्हान्स व्हर्जन त्याच्या दुप्पट आहे. रॉकेटचं नॅव्हिगेशन, कंट्रोल आणि मिशन मॅनेजमेंटला सांभाळण्यास सक्षम असा हा प्रोसेसर आहे. या प्रोसेसरनं भविष्यात सुरक्षा, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये वापरता येईल, असे प्रोसेसर भारतही बनवू शकतो हा विश्वास आपल्याला दिलाय. पण, सध्यातरी १८० नॅनो मीटर आकाराचा विक्रम प्रोसेसर मोबाईल-लॅपटॉपमध्ये लावण्यात येणार्या ६ नॅनो मीटर क्षमतेचा नाहीय, हे आधी समजून घेतलं पाहिजे. आताच्या घडीला महत्त्वाचं म्हणजे अतिशय कॉम्प्लेक्स डिझाईन आणि मॅन्युफॅक्चरिंगचं आव्हान झेलून भारतानं हा स्वदेशी प्रोसेसर बनवलाय म्हणूनच तो खास आहे. आजघडीला काही ठराविक देशांमध्ये उत्पादित होणार्या कच्च्या तेलाचं प्रमाण आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील त्यांच्या किमतीवरून ग्लोबल इकॉनॉमी वरखाली होत असते. कच्च्या तेलावरून जागतिक भू राजकीय दशादिशा ठरत असल्यानं कच्च्या तेलाला काळं सोनं असंही म्हटलं जातं. पण, नव्या जमान्यात सेमिकंडक्टर चिप्सना डिजिटल डायमंड म्हटलं जातंय. पंतप्रधान मोदींनी याचा उल्लेख केलाय. कारण ही चिप दिसायला भलेही छोटी दिसत असली, तरी जगाच्या प्रगतीला गती देण्याची प्रचंड शक्ती छोट्याशा चिपमध्ये सामावलीय. भविष्यात भू राजकीय बदल घडवण्याची अफाट क्षमता या सेमिकंडक्टर चिपमध्ये आहे. त्यामुळं अनेक देश या नव्या तंत्रज्ञानाची कौशल्यं आत्मसात करण्याच्या प्रयत्नात आहेत. भारतही उशिरानं का होईना या शर्यतीय उतरलाय. कारण सद्यस्थितीत काही ठराविक देशांचीच या क्षेत्रात मक्तेदारी तयार झालीय. ती कशी ते बघणं महत्त्वाचं आहे.

करंगळीएवढ्या आकाराचा प्रोसेसर बनवण्याचं तंत्रज्ञानही तेवढंच कॉम्प्लेक्स अर्थात गुंतागुंतीचं असतं. ही चिप किंवा प्रोसेसर बनवण्याची सुरुवात सिलिकॉन वेफर्सपासून होते. या वेफर्सवर विद्युत प्रवाह (करंट) वाहून नेणारे लाखो ट्रान्झिस्टर्स लावून आधी सर्किट बनवलं जातं. आधुनिक चिप्सवर तर कोट्यवधी ट्रान्झिस्टर्स लावलेले असतात. या किचकट प्रक्रियेसाठी अतिशय उच्च दर्जाची अचूकता लागते. जसजशी टेक्नॉलॉजी विकसित होतेय तसतसा चिप्सचा आकार कमी होत ३ नॅनोमीटरपर्यंत येऊन पोहोचयलाय. जेवढी चिप लहान तेवढी ट्रान्झिस्टर्सची घनता (डेन्सिटी) जास्त. कमी आकाराच्या या चिप्स कमी ऊर्जेत फास्ट करण्यात पटाईत असतात.

चिप्समध्येही मॅच्युअर नोड्स आणि ॲडव्हान्स नोड्स असे दोन प्रकार असतात. सिंगल डिजिट नॅनोमीटरच्या चिप्सला ॲडव्हान्स नोड्स आणि डबल डिजिट किंवा २८ नॅनोमीटर आकारावरील चिप्सना मॅच्युअर नोड्स म्हटलं जातं. छोट्या आकाराच्या ॲडव्हान्स नोड्स चिप्स स्मार्टफोन्स, एआय, ब्लॉकचेन, मशिन लर्निंगसाठी वापरल्या जातात, तर मॅच्युअर नोड्स चिप्स ऑटोमोबाईल इंडस्ट्री, कन्झ्युमर गुड्स, एव्हिएशन, मेडिकल डिव्हायसेस आणि मिलिट्री उपकरणांमध्ये वापरल्या जातात. या चिप्स ॲडव्हान्स चिप्सच्या तुलनेत थोड्या स्वस्तही असतात. आपला विक्रम ३२ बिट प्रोसेसर मॅच्युअर नोड्स प्रकारातला.हे झालं हार्डवेअरचं. चिप बनवण्याची सुरुवात होते ती डिझायनिंगपासून. सर्वात आधी चिपचं ब्ल्यूप्रिंट बनवलं जातं. यामध्ये कंपन्या चिपचं आर्किटेक्चर ठरवतात. या चिपचा वापर कुठल्या उपकरणात केला जातोय यावरून चिपमध्ये किती ट्रान्झिस्टर्स लागतील, ते कसं काम करतील, हे ठरवलं जातं. उदा. एखादा स्मार्टफोन चांगली फोटोग्राफी करणारा हवा असल्यास तसं चिपचं डिझायनिंग होतं, एखादी चिप गेमिंग किंवा एआयच्या वापरानुसार डिझाईन केली जाते. डिझायनिंगमध्येही चिप डिझायनिंगचं फक्त सॉफ्टवेअर्स पुरवणार्या, सॉफ्टवेअर्स व लायसन्स देणार्या आणि फॅब्लेस अशा ३ प्रकारच्या कंपन्या असतात.सॉफ्टवेअर्स डिझायनिंगला इलेक्ट्रॉनिक डिझायनिंग ॲटोमेशन (ईडीए टुल्स) असंही म्हटलं जातं. ईडीए टुल्सशिवाय उच्च क्षमतेच्या चिप डिझाईन करणं अशक्य आहे. या ईडीए टुल्समध्ये अमेरिकन कंपन्यांचा मोठा दबदबा आहे. २०२१ मध्ये ईडीएचं ग्लोबल मार्केट ७० हजार कोटी रुपयांचं होतं. त्यात अमेरिकेच्या फक्त ३ कंपन्यांकडं (केडन, सायनॉप्सिस, मेंटर ग्राफीक्स) ७० टक्क्यांहून अधिक वाटा होता. काही कंपन्या चिपचं डिझायनिंग करून त्याचे इंटेलेक्च्यूअल राईट्स स्वत:कडं ठेवून हे डिझाईन वापरण्याचं इतर कंपन्यांना लायसन्स देतात. उदा. युकेची एआरएम लि. ही कंपनी, जी चिपचं डिझायनिंग करून ते लायसन्सनं ॲपलला देते. या एकट्या कंपनीचं वार्षिक उत्पन्न ३५ हजार कोटींहून जास्त आहे.चिप डिझाईन-लायसनिंगचं मार्केट २०२१ मध्ये ४४ हजार कोटींचं होतं. त्यात यूएस आणि युकेच्या कंपन्यांचा वाटा तब्बल ९० टक्क्यांचा होता. तिसर्या श्रेणीत क्वालकॉम, मीडियाटेक, ॲपल, एएमडी, ॲपल, एनव्हिडिया अशा फॅब्लेस कंपन्या येतात. या कंपन्या एआरएमसारख्या कंपन्यांकडून आधी चिप आर्किटेक्चर लायसन्स विकत घेतात आणि त्यात आपल्या डिव्हाईसच्या गरजेनुसार काही प्रोप्रायटरी बदल करून वर उल्लेख केल्याप्रमाणं फॅब कंपन्यांकडून आऊटसोर्सिंगनं चिप बनवून घेतात. चिपचं उत्पादन फॅब किंवा फाउंड्रीजमध्ये केलं जातं. तसं बघायला गेलं तर यूएस, युके, युरोपीयन देशातही चिप बनतात. पण, तैवान, दक्षिण कोरिया, चीन या देशांकडं असलेली एक्स्पर्टीज इतर देशांकडं नाही. त्यातही तैवानमध्ये जगातल्या ७० टक्क्यांहून अधिक चिप्स बनतात.जगभरातील ॲडव्हान्स लेव्हलच्या ९० टक्क्यांहून अधिक चिप्स तर तैवान सेमिकंडक्टर मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. (टीएसएमसी) ही एकटी कंपनीच बनवते. यातही गमतीची बाब म्हणजे चिप डिझायनिंगमध्ये जसा अमेरिकेचा हातखंडा आहे तसाच तो चिप उत्पादनासाठी फाउंड्रीजमध्ये लागणार्या हायटेक मशीन्स बनवण्यातही आहे. यूएससह जपान, नेदरलँड, चीन, तायवानी कंपन्याही या क्षेत्रात आहेत. नेदरलँडच्या एएसएमएल नावाच्या एका कंपनीची तर लेटेस्ट जनरेशन फोटोलिथोग्राफी स्कॅनर इक्युपमेंट बनवण्यात अक्षरश: मोनॉपॉली आहे.

# जन्मजात अंध माला होणार महसूल सहायक पदावर रुजू

## आज मिळणार नियुक्ती पत्र, भारतातील पहिलीच घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती,**



वझर येथील दिव्यांग बेवारस बालगृहातील जन्मजात अंध असलेली माला शंकर पापडकर महसूल सहायक पदावर रुजू होणार आहे. तिला नागपूर येथील कवीवर्य सुरेश भट्ट सभागृहात महसूल सहायक पदाचे नियुक्ती पत्र केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

जन्मजात अंध व बेवारस मुलगी जिद्द, परिश्रम आणि सततच्या सरावाने जवळच्या व्यक्तीनी दिलेल्या साथीमुळे शासकीय पदी नियुक्त होत आहे. अशा प्रकारची ही भारतात पहिला घटना असावी. यामुळे मालाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. जळगाव रेल्वे स्थानकावर बेवारस स्थितीत सापडलेली माला आज महसूल सहायक पदावर पोहचली आहे. माला शंकरबाबा पापळकर यांची ही एक विलक्षण आणि प्रेरणादायी कहाणी आहे.

अंध व बेवारस असलेल्या मालाला अमरावतीच्या वझर येथील दिव्यांग बेवारस बालगृहात आणण्यात आले. जिथे तिच्या जीवनात प्रकाश झाला तो म्हणजे पद्मश्री कर्मयोगी शंकरबाबा पापळकर यांच्यामुळे. त्यांनी तिच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारली. तिचे नाव 'माला' ठेवले. तिला केवळ आश्रयच नाही, तर ओळखही दिली. शिक्षणाची ओढ, वाचनाची आवड आणि शंकरबाबांचा आधाराळे माला शिकत गेली. ब्रेल लिपीतून दहावी, बारावी, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणही झाले.

जगण्यातील प्रत्येक पायरीवर मालासाठी कर्मयोगी शंकरबाबा पापळकर यांची साथ होती. अपंगत्वाच्या मर्यादा झुगारून तिने शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर २०१९ पासून तिने स्पर्धा परीक्षा द्यायला सुरुवात केली. यात तिने २०२३ मध्ये एमपीएससी 'ग्रुप सी' मुख्य परीक्षा उत्तीर्ण केली. जन्मजात अंध आणि बेवारस असलेली मुलगी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्याची भारतातील ही पहिलीच घटना असावी. त्यामुळे हा क्षण सुवर्णाक्षरात लिहिला जाणार आहे.




## पोट लटकलं-मांड्या जाडजूड दिसतात? १ चमचे मेथीचे दाणे घ्या, झरझर उतरेल चरबी

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल वजन वाढण्याची समस्या प्रत्येकालाच उद्भवते. किचनमध्ये ठेवलेली छोटी वस्तूसुद्धा तुमच्या उत्तम तब्येतीचा खजिना असू शकते. मेथीचे दाणे फक्त एक पौष्टीक पदार्थ नसून मेथीच्या दाण्यांचे बरेच फायदे आहेत. मेथीचे दाणे शुगर लेव्हल कमी करण्यापासून केसांची हेल्थ चांगली ठेवण्यासाठी फायदेशीर ठरतात. एसिडीटी किंवा गॅसेसची समस्या अनेकांना जाणवते. अशावेळी मेथीचे दाणे कोणत्याही औषधापेक्षा तुमचं काम अधिक सोपं करू शकतात.



यात डायटरी फायबर्स असतात हे पोट हेल्दी ठेवतात आणि पचनक्रिया मजबूत बनवण्यास मदत करतात. डायबिटीसच्या रुग्णांसाठी मेथी एखाद्या वरदानाप्रमाणे आहे. यातील फायबर्स ब्लड शुगर कंट्रोल करतात आणि मेटाबॉलिझ्म वाढवून शरीर एक्टिव्ह आणि एनर्जेटीक बनवतात.

मेथीच्या दाण्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तंतुमय पदार्थ असल्याने, भारतीय पोषणतज्ज्ञ वजन कमी करण्याच्या आहाराचा भाग म्हणून मेथीच्या पाण्याचा वापर करण्याची शिफारस करतात. जेव्हा तुम्ही मेथीचे दाणे खाता, तेव्हा हा तंतुमय पदार्थ पोटात गेल्यावर पाणी शोषून घेतो आणि फुलतो. यामुळे पोट दीर्घकाळ भरल्यासारखे वाटते. पोट भरल्यामुळे आपोआप जास्त खाणे आणि वारंवार स्नॅकिंग करण्याची सवय कमी होते, ज्यामुळे कॅलरीचे एकूण सेवन कमी होते.

**वजन कमी करण्यासाठी फायदेशीर**

जर तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर मेथीचे दाणे तुमचा प्रवास अधिक सोपा बनवू शकतात. रात्रभर भिजवलेले मेथीचे दाणे सकाळी रिकाम्या पोटी प्यायल्यास भूक कमी लागते आणि बराचवेळ पोट भरलेलं राहतं. ज्यामुळे ओव्हरइटींग टाळता येतं आणि हळूहळू वजन कमी होतं.

मेथीचे दाणे फक्त पोटच नाही तर हृदय आणि सौंदर्य चांगले ठेवण्यातही मदत करतात. ज्यामुळे बॅड कोलेस्टेरॉल कमी होते आणि हृदय रोगाचा धोका कमी होतो. याशिवाय केस गळणं कमी होतं. त्वचेशी संबंधित समस्या उद्भवत नाहीत.

**मेथीच्या दाण्यांचे सेवन कसे करावे?**

एका अभ्यासानुसार मेथीमधील फायबरचे सेवन केल्यास जेवणात कॅलरीचे सेवन कमी होते. एक चमचा मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी रिकाम्यापोटी या पाण्याचे सेवन करा आणि हे दाणे चावून खा किंवा दाणे नको असल्यास गाळून या पाण्याचे सेवन करा. काही दिवसातंच तुम्हाला फरक दिसून येईल. मेथीमध्ये असलेल्या सोल्यूबल फायबर्समुळे पोट भरल्यासारखं वाटतं.

# ऊर्जा संवर्धनाविषयी जनजागृतीसाठी चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** ऊर्जा संवर्धनाविषयी व्यापक जनजागृती होण्यासाठी सर्व शाळांमध्ये 'ऊर्जा संवर्धन व अपारंपारिक ऊर्जा' या विषयावर आधारित चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा राज्यस्तर व विभागस्तरावरील असून या दोन्ही स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्यांचा पारितोषिक देवून गौरव करण्यात येणार आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महाउर्जा विभागाच विभागीय महाव्यवस्थापक प्रफुल्ल तायडे यांनी केले आहे.

विभागातील सर्व शाळा प्रशासनाने चित्रकला व निबंध स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या गटानुसार व स्पर्धेच्या प्रकारानुसार स्थानिक समितीकडून प्रत्येकी तीन विजेत्यांची (प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक) निवड करून त्यांची नावे व निकालाची प्रत (रेखाचित्र व निबंध स्पर्धेची प्रत) महाराष्ट्र ऊर्जा विकास अधिकरण (महाऊर्जा) विभागीय कार्यालय, विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती या कार्यालयास दि. १० ऑक्टोबरपर्यंत सादर करावीत. त्यानंतर महाऊर्जा कार्यालयाकडून सदर निवड केलेल्या विद्यार्थ्यांची नावे राज्यस्तरीय स्पर्धेकरिता पाठविल्या जाईल.

स्पर्धेबाबत विशेषत:

सर्व शाळांनी इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थी गटासाठी 'ऊर्जा वाचवा- पृथ्वी वाचवा काळाची गरज' या विषयावर चित्रकला स्पर्धा घ्यावी. तसेच इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थी गटासाठी 'ऊर्जा संवर्धन काळाची गरज' व 'जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी अक्षय ऊर्जा' या विषयावर निबंध स्पर्धा घ्यावी. 'सेवा पर्व' कालावधीत सर्व शाळांनी ऊर्जा संवर्धन व अपारंपारिक ऊर्जा विषयक जनजागृती कार्यक्रम राबवावे.

स्पर्धेतील विजेत्यांचा महाऊर्जा विभागीय कार्यालयाद्वारे प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येईल. तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल. या स्पर्धेत राज्यस्तरावर व विभागस्तरावर विजेत्या ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वाटप करण्यात येतील. या स्पर्धेच्या समन्वयासाठी महाऊर्जा विभागाचे जिल्हा व्यवस्थापक विजय काळे (मो. नं. ९५६१११६२२६) तसेच प्रकल्प अधिकारी हर्षल काकडे (मो.नं. ९७६४४७५७६४) यांची नेमणूक करण्यात आली असून अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी यांच्याशी संपर्क साधावा, असे महाऊर्जा विभागाद्वारे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# इटलीतील रस्ते अपघातात नागपूरकर दाम्पत्य ठार; मुलासह पाच जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

इटलीतील ग्रोसेटो येथे झालेल्या रस्ते अपघातात नागपुरातील दाम्पत्याचा मृत्यू झाला तर त्यांच्या मुलासह पाच जण जखमी झाले. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी या घटनेला दुजोरा दिला. या घटनेबाबत आपण जाणून घेऊ या.

जावेद अख्तर (५७), नाझिरा अख्तर (४४) असे दगावलेल्या नागपुरातील दाम्पत्याचे नाव आहे. इटलीच्या वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, ग्रोसेटो येथील ऑरेलिया राज्य रस्त्यावर उत्तरेकडे जाणाऱ्या लेनवर आशियाई पर्यटकांना घेऊन जाणारी व्हॅन आणि नऊ आसनी मिनीबसची धडक झाली. यात अख्तर दाम्पत्याचा मृत्यू तर त्यांच्या मुलांसह पाच जण जखमी झाले. अग्निशमन दलाच्या पथकांनी आणि कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांनी जखमींनी तातडीने बचाव कार्य हाती घेत सगळ्यांना रूग्णालयात हलवले.



इटलीतील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते पीडितांच्या कुटुंबीयांच्या आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. आम्ही कुटुंबाला सर्वतोपरी मदत करत आहोत. ग्रोसेटोजवळ झालेल्या अपघातात नागपूरमधील दोन भारतीय नागरिकांच्या दु:खद निधनाबद्दल दूतावासाकडून शोकही व्यक्त केला गेला. जखमींना उपचार दिले जात असल्याचेही दूतावासाचे म्हणणे आहे. या विषयावर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी लोकसत्ताला सांगितले की, इटलीतील ग्रोसेटो येथे झालेल्या रस्ते अपघातात अख्तर दाम्पत्याचा मृत्यू झाला असून त्यांच्या मुलासह इतर काही जखमी असल्याचे रोमधील भारतीय दूतावासाकडून कळवले गेले. वृत्त मिळेपर्यंत तिथे रुग्णालयात प्रक्रिया सुरू होती. त्यानंतर अधिक माहिती मिळणे शक्य होईल, असेही जिल्हाधिकारी म्हणाले. रात्री उशिरापर्यंत या कुटुंबातील नागपुरातील नातेवाईकबाबत माहिती मिळू शकली नाही.

# पोस्टाची अशी योजना जी तुमची गुंतवणूक दुप्पट करते

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**

सर्वांनी पोस्ट ऑफिसच्या योजनांविषयी ऐकले आहे. पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून बचतीसाठी अनेक योजना राबविल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे शेतकऱ्यांसाठी राबवत असलेली किसान विकास पत्र योजना होय सद्यस्थितीत अनेकजण आपल्या पगारातून काही पैसे बचत करत असतो. शेतकरी देखील आपल्या उत्पन्नातून आगामी हंगामासाठी बचत करत असतो. किसान विकास पत्र ही अशी योजना आहे, ज्यामध्ये तुम्ही केवळ १ हजार रुपयांपासून गुंतवणूक सुरू करू शकता. शिवाय गुंतवणुकीवर कोणतीही कमाल मर्यादा नाही, म्हणजे तुम्ही तुमच्या सोयीनुसार तुम्हाला हवे तितके गुंतवणूक करू शकता.




**तुमची गुंतवणूक दुप्पट कशी होते?-** केव्हीपी योजनेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा चक्रवाढ व्याजदर. समजा तुम्ही १ लाख रुपये गुंतवले. पहिल्या वर्षाच्या शेवटी, तुम्हाला ७.५ टक्के दराने व्याज म्हणून ७ हजार ५०० मिळतील, जे पुढील वर्षी मूळ रकमेत जोडले जाईल. ज्यामुळे एकूण रक्कम १ लाख ७ हजार ५०० होईल. त्याचप्रमाणे, दुसऱ्या वर्षी व्याज आणखी वाढेल, ज्यामुळे तिसऱ्या वर्षासाठी आधार तयार होईल. ही प्रक्रिया तुमच्या निधीत वाढ करत राहील. उदाहरणार्थ, जर तुम्ही ५ लाख रुपये गुंतवले तर तुमचा निधी ९.५ वर्षांनी १० लाखांपर्यंत पोहोचेल.

**कोणीही घतझ खाते उघडू शकतो.** या सरकारी योजनेचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या व्यक्तीने किती खाती उघडता येतील, यावर मर्यादा नाही. तुम्ही तुमच्या गरजेनुसार अनेक घतझ खाती उघडू शकता. १० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांच्या नावाने खाती उघडणे देखील शक्य आहे. यामुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्याला गुंतवणूक करणे सोपे होते.

# मुंबई-अमरावती विमान पुन्हा रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** अलायन्स मुंबईवरून आणि मुंबईला जाणाऱ्या विमानाचे एअरच्या येणाऱ्या उड्डाण शुक्रवारी (ता. तीन) रद्द करण्यात आले. एअरलाइनचे अमरावतीचे मुख्य अधिकारी राजकुमार पटेल यांनी रद्दीकरणाची पुष्टी केली. ऑपरेशनल समस्येमुळे मुंबईवरून येणारे विमान आले नाही. परिणामी, परतीचा प्रवास देखील रद्द करण्यात आला. त्यांनी सांगितले की, सकाळी १० वाजता सर्व ५४ प्रवाशांना उड्डाण रद्द झाल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे, प्रवाशांना पुढील सोमवारी विमानाचा पर्याय देण्यात आला आहे. अमरावतीवरून एकमेव विमान मुंबईसाठी आठवड्यातून सोमवार, बुधवार आणि शुक्रवार, असे तीन दिवस आहे. एअरलाइनने ऑपरेशनल समस्यांचे कारण देत वारंवार नियोजित उड्डाणे रद्द केली आहेत, ज्यामुळे प्रवाशांमध्ये निराशा पसरली आहे. दरम्यान, एअरलाइनने २६ ऑक्टोबरपासून नवीन वेळापत्रकासह रविवारची उड्डाणे पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. शुक्रवारचे उड्डाण रद्द होण्याचे कारण हैदराबादवरून मुंबईला जाणारे विमान रद्द करणे होते, जे अमरावतीला येणार होते.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. ४ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण


# अमरावती विभागामध्ये 'माहिती अधिकार सप्ताह' साजरा करण्याचे निर्देश !

## ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती– :**
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि प्रशासनात अधिक पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी अमरावती विभागात दि. ६ ते १२ ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावतीच्या राज्य माहिती आयुक्तांनी यासंदर्भात एक परिपत्रक जारी केले असून अमरावती विभागातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये आणि सार्वजनिक प्राधिकरणांना या सप्ताहाचे प्रभावी आयोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी माहिती अधिकार सप्ताह सप्ताह साजरा केला जातो, आणि यावर्षी अमरावती विभागात तो उत्साहात पार पाडण्यात येणार आहे. या सप्ताहाचा मुख्य उद्देश माहिती अधिकार कायद्यासंबंधी जनमानसात व्यापक जाणीवजागृती निर्माण करणे तसेच प्रशासकीय कामात गतीमानता व सुसूत्रता आणणे हा आहे. या अनुषंगाने सप्ताहाच्या कालावधीत सार्वजनिक प्राधिकरणांव्दारे विविध जाणीवजागृतीचे उपक्रम राबविले जाणार आहे.

या सप्ताहामध्ये माहिती अधिकार कायद्याच्या अनुषंगाने विविध स्तरांवर उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठ आदी शैक्षणिक संस्थांमध्ये 'माहितीचा अधिकार' या विषयावर आधारित पथनाट्ये, प्रश्नमंजुषा, निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्रे आणि कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपालिका,





जिल्हा परिषद इत्यादी आस्थापनांमध्ये कायद्याबद्दल प्रबोधनपर व्याख्याने व कार्यशाळा घेण्यात येतील. माहिती अधिकाराचा वापर करून व्यवस्थेमध्ये सकारात्मक बदल घडवणाऱ्या जागरूक नागरिक व अधिकाऱ्यांच्या यशोगाथा, अनुभवकथनांचे प्रभावी सादरीकरण केले जाईल. तसेच या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब, लॉयन्स क्लब आणि समाजसेवी नागरिकांचे सहकार्य घेण्यात यावे, असेही सांगण्यात आले.

सप्ताहाच्या निमित्ताने प्रशासकीय यंत्रणांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५च्या तरतुदींची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करावी, यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१) (ख) नुसार माहितीचे अद्ययावतीकरण करण्यात यावे. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाने १७ मुद्यांची अद्ययावत माहिती तातडीने वेबसाईट आणि सूचना फलकावर प्रसिद्ध करावी. माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त होणारे सर्व अर्ज विहित मुदतीच्या आत निकाली काढावे. प्रलंबित अपिलांवर विहित कालमर्यादेत सुनावण्या आयोजन प्रकरणांचा निपटारा करावा. शास्तीची प्रकरणे तातडीने हाताळून त्यांचे अनुपालन अहवाल आयोगाकडे त्वरित पाठवावेत. माहितीचा अधिकार अधिनियमांच्या तरतूदी अधिकाधिक लोकांना माहित होतील यादृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत, असेही राज्य माहिती आयोगाने सूचना केल्या आहेत. या सप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांसाठी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सन्माननीय लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी तसेच सर्व शैक्षणिक संस्थांचे शिक्षक, प्राध्यापक, अध्यापक, अधिकारी-कर्मचारी, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या स्वयंसेवी संस्था, प्रगतीशील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, माहितीचा अधिकार कायद्याच्या क्षेत्रातील प्रशिक्षक, व्याख्याते, सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचार व स्वयंस्फूर्तीने सहभाग घेवू इच्छिणारे सर्व नागरिक आदींचा सहभाग घेण्यात यावा. या सप्ताहाचा शुभारंभ ६ ऑक्टोबर रोजी करण्यात येऊन त्या दिवशी उपरोक्त नमूद केलेल्या उपक्रमांपैकी एका उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे. तसेच याची नोंद कार्यालयीन अभिलेखामध्ये ठेवण्यात यावी, असेही कळविण्यात आले आहे.

# परतवाड्यात अंकित राणा प्रकरणाला ट्विस्ट

# १३ जण निर्दोष, सर्वांना क्लीन चिट!

## 'नामसाधर्म्याचा गोंधळ', १३ संशयित निर्दोष ठरले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४परतवाडा –** ऑक्टोबर रोजी परतवाडा शहरात पोलिसांनी घेतलेल्या धाडसत्रानंतर मोठी खळबळ उडाली होती. मुंबई गुन्हे शाखेकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अमरावती ग्रामीण आणि नागपूर गुन्हे शाखेच्या पथकांनी संयुक्त कारवाई करत १३ जणांना ताब्यात घेतले होते. मात्र, तपासाअंती सर्वजण निर्दोष असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मुंबई पोलिसांना हवा असलेला कुख्यात आरोपी परतवाड्यात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ब्राह्मण सभागृह कॉलनी आणि कश्यप पेट्रोल पंप परिसरात कारवाई केली. आरोपीकडे शस्त्र असल्याची शक्यता लक्षात घेता सावधगिरीने रात्री १०.३० वाजता छापा टाकण्यात आला. संशयितांनी पळण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी हवेत एक वार्निंग शॉट फायर केला होता.

तपासादरम्यान समोर आले की, ताब्यात घेण्यात आलेल्यांपैकी एक तरुणाचा आणि मूळ आरोपीचा केवळ 'अंकित राणा' हे नाव समान होते. चौकशीदरम्यान कोणत्याही संशयिताचा कुठल्याही गँगशी संबंध नसल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सर्व १३ जणांची सुटका करण्यात आली.

अमरावती ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत, सार्वजनिक सुरक्षेसाठी अशा माहितीची तत्काळ तपासणी करून कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

# शहरात आज १५२ मंडळांच्या दुर्गा-शारदा देवींचे विसर्जन

## सर्वत्र दुर्गा-शारदा विसर्जनाची लगबग, दोन दिवसात ४३ मंडळांच्या देवींचे शांततेत विसर्जन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**
शहरासह जिल्हाभरात ठिकठिकाणी विराजमान करण्यात आलेल्या आई जगदंबेला निरोप देण्यास बुधवारी १ ऑक्टोबर पासून सुरूवात झाली. जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात असलेल्या सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळांची संख्या पाहता १० दिवसात टप्या-टप्याने विसर्जन करण्यात येणार आहे. बुधवार १ ऑक्टोबरला ८, तर गुरुवार २ ऑक्टोबरला १ आणि शुक्र वार ३ ऑक्टोबरला शहरात ३४ मंडळांच्या देवींचे विसर्जन करण्यात आले. तर शनिवार ४ ऑक्टोबरला १५२ मंडळांच्या दुर्गा-शारदा देवींचे विसर्जन करण्यात येणार आहे. यासाठी शहरात सर्वत्र पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

अमरावती शहरात ४८४ दुर्गा तर १०१ शारदा आणि जिल्ह्यातील ग्रामीण भागात १७०८ दुर्गाव २५४ शारदा स्थापना करण्यात आल्या होत्या. त्यात एक गांव एक दुर्गा ३६० एक गाव एक शारदा १०३ आहेत. त्या अनुषंगाने अमरावती ग्रामीण

घटकामध्ये दुर्गात्सवानंतर विसर्जन शांततापूर्ण व भयमुक्त वातावरणात पार पाडावी, यासाठी शहरात १९५४ आणि

जिल्ह्यात सर्वत्र २८४२ वर असा एकूण ४७९६ पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. यासाठी शहरात पोलिस आयुक्त अरविंद चावरीया यांच्या मार्गदर्शनात ३ डीसीपी, ५ एसीपी, २६ पीएसआय, ७० एपीआय-पीएसआय, १३५० पोलिस, १ एसआपीएफ तुकडी, ४०० पुरुष तर १०० महिला होमगार्ड असे एकूण १९५४ पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच पोलिस ठाणे निहाय शहरातील




महत्वाचे चौक गर्दीचे ठिकाण, मिश्रवसंवेदनशील वस्तीच्या ठिकाणी फिक्स पॉईन्ट लावण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुरक्षेकरीता १४ सीआर मोबाईल, महिला सुरक्षेसाठी १० दामिनी पथके तयार आहे. तसेच वृद्ध नागरिक व बालकांच्या सुरक्षेसाठी पोलिस विभाग सज्ज आहे. तसेच बीट मार्शल व डायल ११२ ची वाहने सुद्धा शहरात पेट्रोलिंग करीता राहणार आहे. शहरात दुर्गादेवी आणि शारदा देवी विसर्जनाची व्यवस्था छत्री तलाव, प्रथमेष तलाव, कोंडेश्वर, ऋणमोचन , वलगाव आदी ठिकाणी करण्यात आली आहे. यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस घटकामध्ये दुर्गोत्सव संबधाने पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांचे मार्गदर्शनात दुर्गा व शारदा स्थापना बंदोबस्त दुर्गा व शारदा स्थापना बंदोबस्त लावण्यात आला आहे. त्यामध्ये जिल्यातील व बाहेरील प्राप्त पोलीस अधिकारी १६२, पोलीस अंमलदार - १८००, एस.आर.पी.एफ. ०१ कंपनी, होमगार्ड आर.सी.पी.पथक - ०३ क्यु. आर. टी. पथक ०१ अशा प्रकारे २८४२ वर पोलिसांचा बंदोबस्तावर तैनात आहे. दुर्गोत्सव संबंधाने जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील डॉल्बी चालक व मालक यांनी मिरवणुकीत डॉल्बी सिस्टीमचा वापर करतांना प्रस्तापित कायदयाद्वारे विहीत केलेल्या ध्वनी मर्यादेतच आवाज नियंत्रित ठेवणेबाबत तसेच आक्षेपार्ह गाणी न वाजविण्याबाबत व धार्मिक तेढ निर्माण करणा-या प्रक्षोभक पोस्ट सोशल मिडीयावर पोस्ट करण्यास प्रतिबंध करण्यासाठी आदेश निर्गमित केले आहे, त्या अनुषंगाने पोलीसांचे सोशल मिडीयावर विशेष लक्ष राहणार आहे. नागरिकांनीकोणत्याही अफवांवर विश्वास ठेवूनयेतसेच पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलिस आयुक्त अरविंद चावरिया व पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी केले आहे.

# सोमवारला नगरपालिका, नगरपंचायती नगराध्यक्षपदाची आरक्षण सोडत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती–**
अमरावती जिल्ह्यात १० नगरपरिषद व ४ नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी सोमवारी, ६ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात येणार आहे. ही सोडत मंत्रालय, मुंबई येथील परिषद सभागृह, सहावा मजला येथे पार पडणार आहे.

जिल्ह्यात १० नगरपालिका व दोन नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. हा कार्यक्रम ८ ऑक्टोबरपासून सुरू होणार असून २८ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. अशातच आता नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची सोडतीचा कार्यक्रम देखील आयोगाकडून जाहीर करण्यात आला आहे. सद्या जिल्ह्यात तिवसा आणि भातकुली या दोन नगरपंचायती वगळता १० नगरपालिका आणि दोन नगरचायतींवर प्रशासक आहे. त्यामुळे येथे आता प्रशासनस्तरावर निवडणुकीची

लगीनघाई सुरू आहे. डिसेंबरमध्ये जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायतीमध्ये



निवडणुकांची शक्यता आहे.आरक्षण या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच नगराध्यक्ष पदांकरिता कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे, चिखलदरा, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, मोर्शी, शेंदूरजनाघाट, वरूड या नगरपरिषदा तर धारणी, नांदगाव खंडेश्वर, तिवसा आणि भातकुली या नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदाकरिता आरक्षण सोडत मुंबई येथे काढली जाणार आहे. सुरक्षिततेच्या कारणास्तव मंत्रालयीन प्रवेशाची परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक पक्षाच्या वतीने फक्त दोन प्रतिनिधींनाच सोडतीसाठी आमंत्रित करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांच्या अध्यक्ष, सचिवयांनी दोन प्रतिनिधींची नावे शिफारस करून शासनाकडे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे औचित्य साधून अमरावतीत ११ भारतीय अभिजात भाषा परिषद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,**
मराठी भाषेला अभिजात भाषेचा सन्मान प्राप्त झाल्याच्या निमित्ताने राज्य शासनातर्फे ६ ते ७ ऑक्टोबर दरम्यान ११ भारतीय अभिजात भाषांची परिषद आयोजित करण्यात आली आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे ही परिषद होणार आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे औचित्य साधून मराठी भाषा विद्यापीठ आणि मराठी भाषा विभागाच्या वतीने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्वामी विवेकानंद सभागृहामध्ये होणार आहे. परिषदेसाठी ११ भारतीय अभिजात भाषांच्या ५५ प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले आहे. परिषदेच्या उद्घाटनाला उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत उपस्थित राहतील. तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिद बारहाते, केंद्र शासनाचे उच्च शिक्षण सहसचिव मनमोहन कौर, म्हैसूर येथील




केंद्रीय भारतीय भाषा संस्थांचे संचालक डॉ. शैलेंद्र मोहन, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल उपस्थित राहणार आहे.

या परिषदेत अभिजात भाषांनी आजवर केलेल्या वाङ्मयीन आणि संशोधनात्मक कार्याविषयी चर्चा होईल. तसेच ११ भारतीय अभिजात भाषांचे भविष्यकालीन ध्येय धोरणाबाबत चितन करण्यात येईल. या अभिजात भाषांकडून पुढील पन्नास वर्षांच्या भविष्यकालीन योजनांचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. भारतीय भाषांचे मूल्यवर्धित होण्यासाठी ही परिषद अधिक महत्त्वाची ठरणार आहे. परिषदेत निमंत्रित अभिजात भाषा सदस्य आपआपल्या भाषेतूनच विषयाची मांडणी करतील. इतर सदस्यांना त्यांच्या भाषेतून ते कळू शकेल, असे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू अविनाश आवळगावकर यांनी दिली.

# रविवारी धावणार तीन हजार धावक

## आठवी अमरावती हाफ मॅरेथॉन राज्यभरातील स्पर्धक होणार सहभागी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –**
अमरावती मॅरॉथॉन असोशिएशन व्दारे रविवारी (ता. पाच) आयोजित आठव्या अमरावती मॅरॉथन स्पर्धेमध्ये अमरावतीसह, राज्यातील व राज्याबाहेरील तीन हजाराहून अधिक धावकांनी सहभाग नोंदविला आहे. ही मॅरॉथॉन २१ किलोमीटर, १० किलोमीटर व पाच किलोमीटर फिटनेस रन सर्वांकरिता तसेच पाच किलोमीटर मुलांकरीता या प्रकारात होणार आहे. २१ किलोमीटरची स्पर्धा रविवारी सकाळी ६ वाजता सुरु होणार आहे. तर दहा किलोमीटर पॉवर रन सकाळी ६.१५ वाजता, पाच किलोमीटर मुलांचा रन पहाटे ६.३० वाजता आणि पाच किलोमीटर फिटनेस रन सकाळी ६.४० प्रारंभ होणार आहेत.

२१ किलोमीटर मैराथॉन शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरू होईल. नंतर पंचवटी मार्गे वेलकम पॉईन्ट, बियाणी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, गाडगेबाबा मंदिराकडे फ्लायओव्हरवरून गाडगेनगर, कठोरा नाका ते पोटे इंजिनिअरिंग कॉलेज व तेथून युटर्न घेऊन परत याच मागनि मॅरेथॉन सुरू झालेल्या ठिकाणीच संपणार आहे.

१० किलोमीटरच्या मॅरेथॉनचा मार्ग शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरू होईल नंतर पंचवटी मार्गे वेलकम पॉईन्ट, बियाणी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, गाडगेबाबा मंदिरा कडे फ्लायओव्हर पुलावरून गाडगेनगर व तेथून युटर्न घेऊन परत याच मार्गाने मॅरेथॉन सुरू झालेल्या ठिकाणीच मॅरेथॉन संपणार आहे. ५ किलोमीटरची स्पर्धा शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरू होईल. नंतर पंचवटीमार्गे वेलकम पॉईन्ट ते विभागीय आयुक्त कार्यालय व तेथून युटर्न घेऊन परत याच मागनि मॅरेथॉन संपणार आहे. धावमार्गात शारिरीक वेदनाशामक स्प्रे सुध्दा ठेवण्यात येणार आहेत. मॅरॉथॉन सुरळीत पार पडण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयाकडून वाहतूक पोलिसाची मदत घेतली जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### या सुविधा पुरविल्या जाणार

मॅरॉथॉनचे मार्गात धावकांचा उत्साह कायम राहण्यासाठी मॅरॉथॉनच्या मार्गात दोन ठिकाणी धावकांचे तुतारीने स्वागत केले जाणार आहे. मॅरॉथॉन सुरु होण्यापुर्वी वार्मअप व्हावा, यासाठी मॅरॉथॉनच्या स्टार्ट पॉईन्टला झुम्बाचे आयोजन केले आहे. मॅरॉथॉनच्या मार्गात ७ ते ८ ठिकाणी वॉटर स्टेशन राहणार आहेत. याठिकाणी, एनरझल, पाणी, खजूर, केळी, चॉकलेट, सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# करजगांव येथील पोलिस चौकीला मान्यता

## आमदार प्रवीण तायडे यांच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४चांदुर बाजार–**
चांदुरबाजार तालुक्यातील शिरजगांव कस्बा पोलिस स्टेशन हद्दीतील गावांची संख्या पहाता तेथील वाढत्या लोकसंख्येचा व भौगोलिक अडचणीचा विचार करता, त्या भागातील वाढती गुन्हेगारी, दिवसेंदिवस फोफावत असलेले अवैध धंदे, महिला अत्याचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता यावर कायदेशीररित्या नियंत्रण मिळविण्यासाठी, तसेच दिवसेनदिवस पोलिस यंत्रणेवर येणारा वाढता ताण लक्षात घेता



नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी, अचलपूरचे आमदार प्रविण तायडे यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करत करजगांव येथे कायम स्वरुपी पोलिस चौकी निर्माण करण्याबाबत केलेल्या मागणीवर गृह विभागाने शिक्का मोर्तब करत अप्पर पोलिस महासंचालक कृष्णप्रकाश यांच्या आदेशान्वये शिरजगांव पोलिस स्टेशन हद्दीतील करजगांव येथे पोलिस चौकी निर्मितीला मान्यता देण्यात आली आहे. आमदार प्रविण तायडे यांनी केलेल्या करजगाव येथील ग्रामवासीयांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# संत्रा गळतीचे सर्वेक्षण करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करा- देवेंद्र भुयार

## संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत जाहीर करण्याची मागणी !

## आमदार देवेंद्र भुयार यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साकडे !



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ वरुड**

मोर्शी तालुका प्रतिनिधी. विदर्भातली संत्रा बागांवर हवामानातील बदलामुळे, सततच्या पावसामुळे होणाऱ्या संत्रा गळतीमुळे लाखो संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडलेले आहे. या गळतीवर प्रतिबंध करण्याकरिता कृषी विभागाने व कृषी विद्यापीठने तातडीने उपाय योजना करून संत्रा गळतीचे सर्वेक्षण करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना तत्काळ ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भेटून केली आहे.

विविध संकटांमुळे आधीच संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. संत्रावरील विवीध रोगांमुळे संत्रा बाग वाळत असल्यामुळे हजारो हेक्टर वरील संत्रा झाडांवर शेतकऱ्यांनी कुऱ्हाड चालवली त्यात आता राहिलेल्या संत्रा पिकाला गळती लागली आहे त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अधिकच अडचणीत सापडला आहे.

विदर्भात संत्र्यांच्या बागांची मोठी गळती सुरू असून शेतकरी चिंतेत आले आहे. संत्र्यांच्या लागवडीसाठी लागलेला खर्चही निघणार नसल्याने संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. सध्या शेतकरी रोज शेतात आल्यानंतर त्यांना गळालेला संत्रा उचलण्याशिवाय पर्याय नाही. गळालेला संत्राचं सर्वेक्षण करायला अधिकारी येईल थोडी फार मदत होइल या भोबळ्या आशेने शेतकरी सध्या अधिकाऱ्यांची वाट पाहत आहेत. कर्ज काढुन त्यांनी संत्रा बागांची मशागत केली व लाखो रुपये खर्च करून विविध बुरशीनाशके व कीटकनाशके फवारणी केली मात्र त्याचासुद्धा कोणतीच फायदा झाला नसल्यामुळे त्याच संत्राचा रस आता जमिनीत झिरपत आहे.

विदर्भाची संत्री ही खायला आंबट गोड आहे. त्यामुळे त्याची मागणीही साता समुद्रापार आहे. पण याचा फायदा मात्र, शेतकऱ्यांना होत नाही. अमरावतीच्या वरुड, मोर्शी, चांदुर बाजार, अचलपूर, तिवसा भागात संत्रा पिकाचं मोठं उत्पादन होत. मात्र, यंदा भाव नाही त्यात संत्रा गळती वाढल्याने आता झाडावर संत्रा राहतील की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

संत्रा विदर्भातील महत्वाचे फळ असून मोर्शी वरूड तालुक्यामध्ये ५० हजार हेक्टर जमीनीवर संत्रा लागवड आहे. यावर्षी मृग बहार अतिशय तुरळक प्रमाणात आला आहे. मात्र आंबिया बहार मोठ्या प्रमाणात आला असून शेतकऱ्याच्या उत्पादनांची भिस्त या आंबिया बहारावर आहे. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय दिलासा देण्यासाठी माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी मोर्शी-वरुड तालुक्यांतील संत्राच्या फळ गळतीचे सर्वेक्षण करून मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. संत्रा हे नगदी पिक असून शेतकऱ्यांना हाताशी आलेल्या पिकाची मोठ्या प्रमाणावर गळती होताना पाहावी लागत आहे.

शेतकऱ्यांचे हे नुकसान टाळण्यासाठी कृषी विभाग, कृषी विद्यापीठ व संत्रा संशोधन केंद्र नागपूर यांनी तातडीने पाहणी करून उपाय योजना करावी, शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे. संत्रा उत्पादक शेतकरी निसर्गाचे अनियमीततेमुळे पचंड आर्थीक संकटात सापडलेला असतांना संत्रा फळ गळतीमुळे उद्भवलेल्या आर्थीक संकटातुन बाहेर काढण्यासाठी शासनाकडून आर्थीक मदत करणे अत्यंत आवश्यक असल्याचे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मदत पुनर्वसन मंत्री व सचिव यांना फोन करून वरूड तालुक्यामध्ये झालेल्या संत्रा गळतीचे तात्काळ सर्वेक्षण करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा आर्थीक नुकसान भरपाईचा मागणी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहे.

# भरधाव ट्रकच्या धडकेत बिबट्याचा झाला मृत्यू

## अमरावती ते चांदूर रेल्वे मार्गावरील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

रस्ता ओलांडणाऱ्या बिबट्याला भरधाव ट्रकने धडक दिली. यात बिबटचा जागीच मृत्यु झाल्याची घटना राज्य राखीव पोलिस दल वसाहतीसमोर शुक्रवारी ३ ऑक्टोबरला रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. मृत्यू झालेला बिबट अंदाजे सात ते आठ वर्षांचा नर होता. अमरावती ते चांदूर रेल्वे मार्गावरील वडाळीलगत राज्य राखीव पोलिस दल वसाहतीसमोरील रस्त्यावरून शुक्रवारी रात्री साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास एक बिबट रस्ता ओलांडत होता.

याचवेळी या मार्गावरून भरधाव जाणाऱ्या ट्रकने बिबट्याला धडक दिली. यात बिबट्याचा जागीच मृत्यु झाला. या वेळी या मार्गावरून जाणाऱ्या वाहन चालकांनी घटनास्थळी थांबून पाहिले असता त्यांना बिबट मृत अवस्थेत आढळला. घटनेची माहिती वनविभाग व फ्रेजरपुरा पोलिसांना दिली. पोलिस व वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वडाळी येथील वनविभागाच्या परिसरात नेला. दरम्यान, पोहरा जंगलात बिबट्याचा वावर असून, बिबट अनेकदा चांदूर रेल्वे मार्ग ओलांडत असतात. यापूर्वी देखील एका बिबट्याचा मृत्यु झाल्याची घटना घडली होती.

# स्वच्छता ही सेवावर उत्कृष्ट चित्रे काढणाऱ्यांना पुरस्कार

## प्रत्येक शाळेतून ३ विद्यार्थ्यांची निवड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** महापालिकेतर्फे मनपा आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा-चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा २०२५ पंधरवडा अंतर्गत शहरातील विविध शाळांमध्ये स्वच्छता विषयक चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांनी 'माझ्या शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर', 'स्वच्छता म्हणजे आरोग्य', 'कचऱ्याचे वर्गीकरण', 'प्लास्टिकला नकार- स्वच्छतेला होकार', आणि 'हरित व स्वच्छ माझे अमरावती' यावर आपली कल्पकता आणि कलागुण मांडून आकर्षक चित्रे तयार केली. या स्पर्धेत सहभाग घेतलेल्या प्रत्येक शाळेतून उत्कृष्ट चित्र काढणारे तीन विद्यार्थी निवडण्यात आले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३० सप्टेंबर रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मनपा शिक्षण अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, आयईसी टीम, विविध शाळांमधील शिक्षक तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अमरावती महापालिकेतर्फे आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच 'माझे शहर, माझी जबाबदारी' हा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला.

# शेतकऱ्यांसाठी धरणे देणाऱ्यांचेच फलक मनपा पथकाने काढले

## युनायटेड फोरमने अडवले महापालिकेचे वाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** मनपा शहरात अनधिकृतपणे लावले जात असलेले जाहिरात फलक काढत आहे. शुक्रवार ३ रोजी झोन क्र. ३ दस्तूरनगर अंतर्गत येणाऱ्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी पाचव्या दिवशी धरणे आंदोलन करणाऱ्या युनायटेड फोरमचे फलक मनपाच्या अतिक्रमण निर्मुलन व बाजार परवाना विभागाच्या संयुक्त कारवाईत काढले. ते मनपाच्या वाहनात टाकले. हे युनायटेड फोरमचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांना कळाल्यानंतर त्यांनी फलक जप्त करणाऱ्या वाहनाला घेराव घालून त्याच्यापुढेच धरणे दिले. त्यामुळे येथे मनपा पथक व आंदोलकांमध्ये काही वेळ वाद निर्माण झाला होता.

यावर शहरात नेत्यांचे फलक चालतात. पण, शेतकऱ्यांच्या आंदोलनाचे नाही. मनपा अतिक्रमण विभागाद्वारे कारवाईत भेदभाव केला जात आहे. युनायटेड फोरमद्वारे शेतकरी, शेतमजुरांच्या मागण्यांसाठी बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे. शासन, प्रशासन व नागरिकांना माहित व्हावे म्हणून आंदोलन स्थळाच्या बाजुला फलक लावले. ते मनपा प्रशासनाला खुपल्याने त्यांनी काढल्याची प्रतिक्रिया युनायटेड फोरमचे पदाधिकारी किरण गुडधे यांनी दिली.

अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई, १०८ बॅनर जप्त झोन ३ दस्तूरनगर अंतर्गत आज अनधिकृत जाहिरात फलकांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली. संपूर्ण परिसरातील इलेक्ट्रिक खांबांवर तसेच इतरत्र लावलेले बॅनर आणि पोस्टर काढून टाकले गेले. या कारवाईत एकूण १०८ बॅनर-पोस्टर जप्तीमध्ये घेतले गेले आहेत. मनपा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, शहरातील स्वच्छता, नियमांचे पालन, सौंदर्य सुनिश्चित करण्यासाठी अशा प्रकारच्या अनधिकृत पोस्टर लावण्यावर कारवाई केली जाणार आहे. मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, अनधिकृत पोस्टर व बॅनर लावणे टाळावे, नियमांचे पालन करावे. शहराची स्वच्छता, सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.

# डॉ आंबेडकर युवा संघातर्फे धम्म प्रवचन, बुद्ध भीम गीत कार्यक्रम

## धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याला अनुयायांची मोठी उपस्थिती




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजया दशमी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमी येथे अनुयायी सोबत भदंत चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा स्वीकारली. हा दिवस भारत देशात धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून उत्साहात साजरा केला जात असतो. यंदाही ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन ठिकठिकाणी उत्साहात साजरा केला. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक इर्विन चौक येथे डॉ. आंबेडकर युवा संघ वतीने धम्मप्रवचन सह बुद्ध भीम गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन करून अनुयायांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून शहर पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे आदी पोलिस अधिकारी, विनोद भालेराव, गोपाल इंगळे, सचिन गवई, मिलिंद तायडे, गजानन जाधव, गौरव खोंड आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला हार अर्पण करून अभिवादन केले.या वेळी पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे यांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.तीन सत्रात कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पहिल्या सत्रात भदंत शीलवंसलंकार यांच्या वतीने धम्मदीक्षा सोहळ्यावर मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय श्रृंगारे, राहुल खंडारे, आतिष डोंगरे, डॉ नरेंद्र गुळदेवकर, सूरज गवई, भारत पाटील, डॉ सुमेध राऊत, सागर डोंगरे, इंजिनियर प्रवीण गवई, विक्रम ढोके, अक्षय नरगडे , सुधीर गाडे, रघुनाथ भंकाळे यांनी परिश्रम घेतले.

# ईकेवायसी'च्या ओटीपीची अडचण दूर करणार

## मंत्री अदिती तटकरेंचे लाडक्या बहिणींना आश्वासन,



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मुंबई-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारला राज्यात पुन्हा सत्तेत आणण्यासाठी गेमचेंजर ठरल्याचे मानले जाते. या महत्त्वपूर्ण योजनेअंतर्गत, पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. मात्र, या योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांना महिला व बालविकास विभागाने विकसित केलेल्या पोर्टलवर ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

सध्या लाभार्थी महिलांना या ईकेवायसी पोर्टलवर ओटीपी मिळण्यात तांत्रिक अडचणी येत असल्याचे समोर आले आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट करून या अडचणींची नोंद घेतली आहे. ईकेवायसी प्रक्रियेत येणाऱ्या ओटीपीसंबंधीच्या या तांत्रिक अडचणी लवकरात लवकर दूर केल्या जातील, असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

अदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ईकेवायसी करताना ओटीपी बाबतकाही तांत्रिक अडचणी येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. महिला व बालविकास विभागाच्या वतीने याची गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, तज्ज्ञांच्या माध्यमातून याबाबत उपायोजना करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच ही तांत्रिक अडचण दूर होऊन ईकेवायसी प्रक्रिया अधिक सुलभ व सुकर होणार याबाबत मी सर्व लाडक्या बहिणींना आश्वस्त करते, असे आश्वासन तटकरे यांनी दिले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व लाभार्थी महिलांसाठी ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेत केवळ लाभार्थी महिलेचीच नव्हे, तर तिच्यासोबत पती किंवा वडिलांची ई-केवायसी करणेही अनिवार्य आहे. याचा उद्देश हा आहे की, लाभार्थी महिलेचे वार्षिक उत्पन्न तसेच तिच्या पतीचे किंवा वडिलांचे वार्षिक उत्पन्न शोधले जाईल. जर महिलेचे लग्न झाले असेल तर तिच्या पतीचे आणि लग्न झाले नसेल तर वडिलांचे उत्पन्न तपासले जाणार आहे.

# अमरावतीत तिसरे विदर्भ लेखिका साहित्य संमेलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने तिसरे विदर्भ लेखिका साहित्य संमेलन ५ आणि ६ ऑक्टोबरला अमरावतीच्या कांचन रिसॉर्ट येथे घेण्यात येणार आहे. आदिवासी साहित्याच्या अभ्यासक आणि साहित्यिक उषाकिरण आत्राम या साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून लाभलेल्या आहे. सुप्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. मनीषा यमसनवार , नागपूर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. अमरावतीच्या फर्स्ट लेडी गव्हर्नर कमलताई गवई विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पुणे येथील सुप्रसिद्ध साहित्यिक ज्योत्स्ना चांदगुडे या साहित्य संमेलनाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहत आहेत. अमरावती येथील सुप्रसिद्ध उद्योजिका कांचन ल्हे यांनी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्षपद स्विकारले आहे. नवीन अध्यक्षांना सूत्रे बहाल करण्याकरता पूर्व अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार विजया ब्राह्मणकर, नागपूर मंचावर उपस्थित राहणार आहेत.

३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठीला अभिजात दर्जा प्राप्त झाला त्यानंतरचे हे पहिलेच वर्ष..! त्यामुळे या सप्ताहात हे साहित्य संमेलन जाणीवपूर्वक आयोजित केलेले असून अभिजात मराठी ही साहित्य संमेलनाची थीम राहणार आहे. ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची सुरूवात होणार आहे. दोन दिवसात दहा सत्र होतील. ज्यामध्ये मराठी भाषेच्या अभिजात समृद्धीमध्ये वैदर्भीय लेखिकांचे योगदान या विषयावरील परिसंवादासह बदलती जीवनशैली या विषयावरील परिसंवाद अशा दोन परीसंवादांचे आयोजन केलेले आहे.

# उद्या कारंजा लाड येथे विदर्भ संकल्प मेळावा

## विदर्भवादी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि४ अमरावती**

अमरावती विदर्भ राज्य आंदोलन समितीचा संकल्प मेळावा रविवार ५ ऑक्टोबर रोजी धावेकर सभागृह कारंजा लाड जि. वाशीम या ठिकाणी ११ ते ४ बाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे.




अमरावती जिल्ह्यातील पदाधिकारी आपापल्या कार्यकर्त्यांना घेऊन मेळाव्याच्या यशस्वी ते करिता बहुसंख्याने उपस्थित राहणार आहे या अगोदर अमरावती भंडारा, गोंदिया चिखलदरा विदर्भ सकल्प मेळावे घेण्यात आले व यशस्वीरित्या पार पडले. आणि म्हणून कारंजा लाड येथे होणाऱ्या मेळाव्याच्या निमित्ताने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी जनजागृतीच्या दृष्टीने माहिती देऊन बैठका येण्यात येत आहे.या मेळाव्याला विदर्भ राज्य आआंदोलन समितीचे अध्यक्ष माजी आमदार वामनराव चटप, राज्य महिला अध्यक्षा रंजना मामर्डे पूर्व विदर्भअध्यक्ष अरुण भाऊ केदार, युक आधाही अध्यक्ष मुकेश मासुरकर, दैनिक देशोन्नत्ती चे मुख्य संपादक प्रकाश पोहरे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्रा. डॉ. पी आर राजपूत प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे.करिता या मेळाव्याला विदर्भ प्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याच्या आवाहन जिलाध्यक्ष राजेंद्र आगरकर शहराध्यक्ष रियाज खान जिल्हाध्यक्षा सुषमा मुळे, प्रा. शरद पुसदकर प्रा. प्रकाश लड्डा, राजाभाऊ पुसदेकर, सुनील साबळे डॉ. विजय कुबडे माधवराव गावडे, सतीश प्रेमलवार, दिलीप भोयर,अशोक हांडे, बाबाराव जाधव, दिनकर निस्ताने, ज्ञानेश्वरराव चौधरी, दिनेश बक्स, विष्णुजी काळमेघ, जीवन पचगाडे, अशोक राणे संजय हाडोळे गजानन दुधाट, दिगंबर चुनो. सरला सपकाळ, अनुष्का बेलोरकर, अनिल वानखडे गणेश कुत्तराम, डॉ. निळकंठ पावलकर, ताराबाई बारस्कर स्वप्निल वाकोडे, धनराज गोटे, पाडुरंग बिजवे, अजय सुरटकर, साहेबराव इंगळे, ज्ञानेश्वर डांगारकर, विलास धाडे यांनी केले.

# कुऱ्हा येथील भोंदू वैद्य बनला मल्टीस्पेशालीटी डॉक्टर

## दंत चिकित्सा, मूळव्याध, सर्दी, ताप, औषध विक्रीही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४करजगाव**

तालुक्यात अनेक बंगाली डॉक्टर स्थानिकांच्या जीवितीशी अगदी दिवसाढवळ्या खेळत आहेत. प्रशासनाचा कुठलाच अंकुश राहिलेला नाही वा कारवाई झालेली दिसत नाही. कुहा देशमुख येथील सिंकदर नामक बंगाली डॉक्टर गावात आला खाली हात आणि स्थानिकांच्या जीवाशी खेळत प्रैक्टिस सुरू केली. सुरुवातीच्या दिवसात मूळव्याध वर उपचार सुरु केला परंतु कुहा येथे पोषक वातावरण मिळालेल्या नंतर त्याने सर्दी, ताप यासारख्या रोगावर उपचार करता करता तो आता दंत चिकित्सा करत आहे. सब बिमारी एकही इलाज अशा पद्धतीने तो बिनधास्त वापत आहे. नंतर त्याने स्वतः औषध विक्री सुरू केली. भाड्याने राहत असलेला तो लाखोची माया ही जमविली. आज



बंगाली बाबू डॉक्टर आज स्थायिक झाला आहे.

**कोणती तपासणी न करताच बनला डॉक्टर**

तो डॉक्टर मूळव्याध चा उपचार करता-करता मल्टीस्पेशालिटी डॉक्टर बनला. त्याने साधा सर्दी, ताप ते दंत चिकित्सा असो कुठलाही उपचार वीणा तपासणी अंदाजे उपचार सुरू केल्याने सर्वसामान्य नागरिकाच्या जीविताची खेळत असून औषध प्रशासन व आरोग्य यंत्रणा प्रशासन गप्प का?

**एक महिला चुकीच्या उपचाराने दगावली**

बंगाली बोगस डॉक्टरच्या उपचाराने एक महिला दगावली असल्याची चर्चा पंचक्रोशीत आहे परंतु तक्रार दाखल न झाल्याने प्रकरण उघडकीस आले नाही. परंतु सामांन्यांच्या जिविताशी कधी पर्यंत चालेल हा जीवघेणा खेळ? हा प्रश्न कायमच अनुत्तरित आहे. प्रशासन जीवघेण्या प्रकाराला मूकसंमती देत आहे का?

# अमरावतीतील काळाराम मंदिरात नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर संपन्न

## हरिना फाउंडेशनतर्फे आयोजित शिबिरात ५८ रुग्णांची तपासणी, २४ रुग्णांना चष्म्यांचे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

सक्करसाथ परिसरातील काळाराम मंदिर, अमरावती येथे नवरात्री मंडळ महोत्सवाच्या निमित्ताने एक सामाजिक उपक्रम म्हणून नेत्र तपासणी व अल्पदरात चष्मा वाटप शिबिर स्वर्गीय लीलाबेन मंगलजी भाई पोपट यांचा स्मृति आयोजित करण्यात आले. हरिना फाउंडेशनच्या वतीने आयोजित या शिबिरात एकूण ५८ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर २४ रुग्णांना आवश्यकतेनुसार चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून श्री. सुनील गोयनका आणि श्री. राजू गोयनका उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

शिबिरासाठी हरिना फाउंडेशनचे कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत पोपट, उपाध्यक्ष रामप्रकाश गिल्डा, सचिव राजेंद्र वर्मा, नेत्रदान प्रमुख श्री. शरद कासट, शिबिर प्रमुख श्री. संजय भुतडा, अवयवदान प्रमुख प्रा. मुकेश लोहिया, सौ. रश्मी नावंदर आणि अजय टांगे यांची विशेष उपस्थिती होती.

रुग्णांची नेत्र तपासणी डॉ. दिनेश वरदानी यांनी केली, तर चष्मा वाटपाची जबाबदारी हर्षाली विजयकर यांनी यशस्वीपणे पार पाडली. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला असून, अशा सामाजिक उपक्रमांनी जनजागृती वाढत असल्याची प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

# पाणीपुरवठ्याशी संबंधित कामे बंद करण्याचा कंत्राटदारांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सार्वजनिक बांधकाम विभागातील कंत्राटदारांप्रमाणेच आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटदारांनी सुध्दा थकीत देयकांसाठी आपला आवाज बुलंद केला आहे. मजीप्राच्या कामांची देयके अद्यापही अदा न करण्यात? आल्याने या मजीप्रा कंत्राटदार असोसिएशनच्या वतीने पाणीपुरवठ्याशी संबंधित कामे बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात कंत्राटदार संघटनेच्या वतीने कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.जीवन प्राधिकरण कंत्राटदार असोसिएशनच्या बत्तीने यापूर्वी सुध्दा देयके देण्यासंदर्भात पत्र दिले होते, मात्र त्यासंदर्भात अजूनही निर्णय घेण्यात आला नाही. केलेल्या कामाची देयके अदा न केल्यामुळे दैनदिन पाणीपुरवठ्यावर काम करताना दुरुस्तीसाठी लागणारा खर्च आणि कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी आर्थिक ताण निर्माण होत आहे, असे कंत्राटदारांचेम्हणणे आहे. देयके अदा करण्यासाठी १० दिवसांचा अवधी देण्यता आला आहे. त्यानंतर मात्र सर्व कंत्राटदार पाणीपुरवठा संबंधित सर्व कामे बद करतील, असा इशारा देण्यात आला. पाणीपुरवठ्यासंदर्भात गैरसोय व व्यत्यय निर्माण झाल्यास त्याला कंत्राटदार जबाबदार राहणार नाही, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यावेळी धनजय बंड, नितीन काळे, संदीप डाखोडे, अनिल भटकर, सुधीर गिरी, सुभाष राठोड, सुरज मौरे, नीलेश मस्के, नितीन शिरभाते, आकाश कराळे, अमोल सावंत, श्यामकुमार गहले, मिथिलेश तिवारी, शुभम कंचनपुरे, अनिकेत झगेकर, अजय लेंडे, मुर्तुजा होलावाला, मंगेश बडनखे, सौ. के. भालचक्र, गणेश भुसे, भास्करराव नाकट, संजय सिंह, अमर सिंह, बिजवे, अजय वानखडे, सय्यद अख्तार सय्यद रशीद, अनिल वाघ, विजय अस्वार, नीलेश चिलात्रे आदी उपस्थित होते.

# कै.भा.वा.शिंपी गुरुजी यांच्या जयंती निमित्य कतुत्ववान महीलांचा सत्कार सोहळा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती महीला आघाडीचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा महिला आघाडी तर्फे सन २०२५ - २६ मधील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त महिलांचा, सेवानिवृत महिला शिक्षिका भगिनींचा, विविध क्षेत्रात नावलौकिक करणाऱ्या महिलांचा सत्कार सोहळा आयोजित सोनल कॉलनी, शेगाव - राहटगाव रोडअमरावती येथे ३ऑक्टोबर २०२५ला *सौ. सरिता दीपक काठोळे अध्यक्ष, जिल्हा महिला आघाडी व सर्व तालुका महिला कार्यकारिणी सदस्या, अमरावती जिल्हा यांनी जिल्हातील कतृत्वान महीलांचा सत्कार सोहळा आयोजित केला होता.



दि.३/१०/२५ ला कै. भा वा. शिंपीगुरुजी यांच्या जयंती दिनानिमित्त महाराष्ट्राचे प्राथमिक शिक्षक समिती जिल्हा महिला आघाडी तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त उच्च श्रेणी मुख्याध्यापिका आदरणीय सविताताई चर्जन,प्रा. डॉ. शोभाताई रोकडे,जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष सरिताताई काठोळे,आदरणीय प्रवीणताई कोल्हे राज्य महीला प्रतिनिधी,लताताई टेंबरे,माजी संचालिका सौ.अर्चना सावरकर, सेवानिवृत्त शिक्षिका तसेच तालुका महिला आघाडी,अध्यक्ष अमरावती होत्या.सर्वप्रथम गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष सरिता काठोळे यांनी केले.नंतर राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त सविता वासनकर/जावरकर,जिल्हा आदर्श पुरस्कार प्राप्त ,वनिता जावरकर,इंदिरा रेवस्कर,लता गणवीर,बबीता पंडितयांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तसेच वर्षा ठाकरे( समाजसेवा),स्वाती वानखडे( साहिल),कल्पना, ठाकरे(उत्कृष्ट प्रशासक),अरुणाताई देशमुख(उद्योजिका),जयश्री शेकार( कला),रोशनी निंभोरकर(उत्कृष्ट संचलन),माधुरी ठवळी( कॅंसर वॉरीयर),मोनिका देशमुख( उत्कृष्ट नियोजन)यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला शिक्षक समितीच्या महीला पदाधिकारी,सद् स्य उपस्थित होते.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चरमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे स्वागत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

आर्किटेक्चर कॉलेजमधील प्रवासाची सुरुवात करताना विद्यार्थी एक सर्जनशीलता आणि नवोपक्रमाच्या जगात पाऊल ठेवतात, जिथे त्यांना आपल्या कल्पना ठोस डिझाइन्समध्ये रूपांतरित कराव्या लागतात, सौंदर्य आणि कार्यक्षमतेमध्ये समतोल साधावा लागतो, आणि आपल्या दैनंदिन आयुष्याला आकार देणाऱ्या बांधकाम क्षेत्राला पर्यावरणाची सखोल समज प्राप्त करावी लागते.

कॉलेजने नवीन प्रथम वर्षाच्या आर्किटेक्चर डिग्री आणि डिप्लोमा कोर्सच्या विद्यार्थ्यांचे स्वागत खास उत्साहात साजरे केले. कार्यक्रमात पुष्पगुच्छ आणि स्टेशनरी किट देऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. हा स्वागत समारंभ नुकताच पी. आर. पोटे पाटील आर्किटेक्चर कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य संजय देशमुख सरांनी कॉलेजद्वारे आयोजित विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी पी. आर. पोटे पाटील ग्रुपतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय मोफत सहली आणि नियमित विद्यार्थ्यांसाठी देशांतर्गत हवाई सहलींच्या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच, शैक्षणिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कसा उपयुक्त आहे हे सांगितले. त्यांनी 'टेकेलॉन्स', 'आर्की टेकेलॉन्स' आणि इतर सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांविषयी माहिती दिली.

आर्किटेक्ट वर्षा वर्हाडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे आर्किटेक्चर आणि हे कॉलेज करिअरसाठी निवडल्याबद्दल अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की आर्किटेक्चर ही एक प्राचीन आणि सन्माननीय व्यावसायिक क्षेत्र असून, आजच्या काळात यामध्ये एआय-आधारित डिझाइन टूल्सचा वापर झपाट्याने वाढत आहे.

आर्किटेक्ट नितीन कदम सरांनी आर्किटेक्चर क्षेत्रात मोकळ्या विचारसरणीची आणि अनुकूलतेची गरज अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी नेहमी अपडेट राहावे आणि आपल्या भाग्याचे भान ठेवावे, असेही त्यांनी सांगितले. पी. आर. पोटे पाटील ग्रुपच्या विविध उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व शैक्षणिक विकासासाठी कसा फायदा होतो हे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यक्रमात दी. इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (आय. इ. आय.) अमरावती सेंटरचे मानद सचिव प्रा. राम विघे सरांनी विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक चर्चासत्र, सेमिनार्स यांचे आयोजन नियमितपणे केले जाते, याबद्दल माहिती दिली. या वेळी आय. इ. आय. च्या विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख अतिथींनी प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

याव्यतिरिक्त, दरवर्षीप्रमाणे गणपती मूर्तिकला, रंगकला आणि चित्रकला स्पर्धांमध्ये पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमाणपत्र देवून करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी, इ-लेह चतुर्थ वर्षातील अनघा लांजेवार आणि पार्थ देशमुख यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसोबत आपले अनुभव शेअर केले.


कार्यक्रमाचे संचालन आर्किटेक्ट त्रुप्ती भामकर मॅडम यांनी केले. आर्किटेक्ट अमित गाडगे, आर्कि. स्नेहल विधळे, आर्कि. अंकुश खंडारे, आर्कि. पलाश अग्रवाल, आर्ट भूपेंद्र जैस्वाल तसेच इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाची भूमिका बजावली.

# महापालिकेत नव्यानेच परिवहन विभाग स्थापन

## कोंडेश्वर मार्गावरील डेपोच्या बांधकामाची निविदा प्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महापालिकेला मंजूर झालेल्या 'पीएम ई' फसचे संचालन करण्यासाठी महापालिकेत नव्यानेच परिवहन विभागाची स्थापना करण्यात आली असून, परिवहन व्यवस्थापक म्हणून राजेश अडोकार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



केंद्र सरकारकडून ई-बसच्या या प्रकल्पाला नोव्हेंबर २०२३ मध्ये मंजुरी मिळाली होती. त्याअंतर्गत केंद्र शासनाकडून महापालिकेला ४९ ई-बसेस मंजूर झाल्या. जकात नाक्याजवळील २.३८ हेक्टर आर जागेवर डेपोचे बांधकाम करण्यात येणार असून, महापारेषणच्या पॉवर स्टेशनपासून ते ई बसडेपोपर्यंत विद्युत पुरवठा करणे, डेपोच्या आतील विद्युतीकरण आदी कामाकरिता निविदा लावण्यात आली आहे. डेपोचे संचालन करण्यासह इतरही संबंधित कामांसाठी महापालिकेत स्वतंत्र परिवहन विभाग असणे अपेक्षित होते.त्यामुळे परिवहन विभागाची स्थापना करण्यात आली आहे. या परिवहन विभागाच्या प्रमुखपदी राज्य परिवहन मंडळाच्या नागपूर कार्यालयातील निवृत्त व्यवस्थापक राजेश अडोकार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, केंद्र सरकारने नेमलेल्या कंत्राटदाराला महापालिकेकडून कार्यारंभआदेश (वर्क ऑर्डर) देण्यात आला असला, तरी डेपोची उभारणी बाकी असल्याने अद्याप शहरात बसेस आलेल्या नाहीत.

# जरुड हायस्कूलमध्ये भव्य रंगभरण व चित्रकला स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४ वरूड**

तालुक्यातंर्गत येत असलेल्या जरुड हायस्कूल, जरुड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य प्रमाणात रंगभरण व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.ही स्पर्धा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित जरुड हायस्कूल व पी. जी. राऊत कनिष्ठ महाविद्यालय, जरुड यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडली.स्पर्धेत जरुड हायस्कूल, स्व. बाळासाहेब देशमुख विद्यालय, जि. प. शाळा मुले व मुली, वसंतराव नाईक विद्यालय, विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूल आदी शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लहानग्यांपासून ते उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी कलाविश्वात आपल्या कल्पनांना रंग देत सुंदर चित्रांची निर्मिती केली.

# अंबानगरीत थाटात पार पडली महिला भजन स्पर्धा

## अंबाई महिला मंडळाचे प्रथम पारितोषिक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

गिरीकल्प बहुउद्देशीय महिला विकास संस्था व प्रिमिअर कॉर्पोरेशन, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंबानगरी भव्य महिला भजन स्पर्धा २०२५ नुकतीच संत गाडगे बाबा महाराज सभागृह, गाडगेनगर येथे भव्य दिव्य पद्धतीने पार पडली. ग्रामीण आणि शहरी भागातील शेकडो महिला भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाला रंगत आणली.

कार्यक्रमाच्या आयोजक सौ. देवयानी ज्ञानेश्वर कुर्वे होत्या. या स्पर्धेत अंबाई महिला भजनी मंडळाने उत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम क्रमांक पटकावला. मंडळाला रोख रु. ५०००/-, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या मंडळातील सहभागी महिला होत्या - सौ. संगीता वाटाणे, सौ. उषा सौदागर, सौ. मालाताई सौदागर, सौ. छायाताई मुंदाने, सौ. मयुरी झोपटे, सौ. सोनाली केवतकर, सौ. पावडे, सौ. तुफाडे, सौ. शारदा पोहोकार, सौ. सुनीता सौदागरे, व सौ. अनुराधा मुलनकर.महाकाली महिला भजनी मंडळ, वृंदावन कॉलनी यांनी द्वितीय क्रमांक पटकावत रु. २५००/- चे पारितोषिक मिळवले. गुरुदेव महिला भजनी मंडळ यांना तृतीय क्रमांक मिळाला व त्यांनाही रु. २५००/- चे पारितोषिक देण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. बळवंतराव वानखडे (खासदार, अमरावती लोकसभा) होते. बक्षीस वितरण मा. लप्पीसेठ जाजोदिया (उद्योगपती व ज्येष्ठ समाजसेवक) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणारा ठरला असून, उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.

# धक्कादायक: अमरावतीतही 'आय लव्ह मोहम्मदचा ट्रेंड'; पश्चिम क्षेत्रात लागले स्टिकर्स

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

कुर्ला (मुंबई), नागपूर, अहिल्यानगर भागात आय लव्ह मोहम्मदच्या स्टीकरवरून उठलेलं वादळ आणि त्याचं वादात रूपांतर झाल्यानंतर हाच ट्रेड सध्या अमरावतीच्या पश्चिम क्षेत्रात पाहायला मिळतोय. चक्क शासकीय मालकीच्या उड्डाण पुलावर 'आय लव्ह मोहम्मद' चे स्टिकर्स लागल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे अमरावतीत हिंदुत्ववादी संघटना आक्रमक होण्याची शक्यता आहे.






उत्तरप्रदेशातील कानपूर येथून सुरू झालेल्या 'आय लव्ह मोहम्मद'च्या वादाचे महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागात तीव्र पडसाद उमटल्याचे पाहायला मिळाले. याला उत्तर म्हणून अनेक ठिकाणी 'आय लव्ह महादेव' असे बॅनर झळकल्याचे पहायला मिळाले. याच प्रकारातून मुंबईतील कुर्ला, नागपूर आणि अहिल्यानगर भागात मोठा तलाव निर्माण झाला होता. काही ठिकाणी पोलिसांकडून लाठीचार्ज केल्याच्याही घटना घडल्या होत्या. या घटना ताज्या असतानाच अमरावतीतही 'आय लव्ह मोहम्मद'चा ट्रेड पश्चिम क्षेत्रात पाहायला मिळतोय. अमरावती शहरातील चित्रा चौकापासून ते नागपुरी गेट पोलीस स्टेशन क्षेत्रात जाणाऱ्या शासकीय उड्डाण पुलावर चक्क 'आय लव्ह मोहम्मद'चे टिकर्स लागल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे अमरावतीत हिंदुत्ववादी संघटना आक्रमक होण्याची चिन्हं आहेत. तर दुसरीकडे भाजप खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी या प्रकारावर तीव्र आक्षेप घेत सार्वजनिक ठिकाणी पोस्टर लावणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता अमरावतीच्या पश्चिम क्षेत्रात लागलेले आय लव्ह मोहम्मदच्या स्टिकर्सवर प्रशासन काय कारवाई करते, याकडे लक्ष लागले आहे.

**दंगे करण्याचे कटकारस्थान शिजतेय : अनिल बोंडे**

या संपूर्ण प्रकरणावर तीव्र आक्षेप घेतला खासदार अनिल बोंडे म्हणाले, 'आय लव्ह मोहम्मद'चे स्टिकर्स लावून अमरावतीत दंगे करण्याचे कटकारस्थान शिजत असल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केलाय. एवढेच आय लव मोहम्मद लावायच आहे तर त्यांनी त्यांच्या दुकानात, टॅक्सी, ऑटोमध्ये लावाव. हिंदूही ठरवतील त्यांच्या दुकानात जायचं की नाही. ऑटोमध्ये बसायचं की नाही, असंही अनिल बोंडे यांनी म्हटलंय. कोणी जास्त मस्तीमध्ये आलं तर त्याची मस्ती उतरविण्यात महाराष्ट्राचे पोलीस प्रशासन निश्चित आहे, असा गंभीर इशारा देखील बोंडे यांनी दिलाय.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवाला उद्यापासून गुरुकुंजात प्रारंभ

## ११ ऑक्टोंबरला सर्वधर्मीय प्रार्थना व मौनश्रद्धांजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ गुरु. मोझरी**

संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देणारे क्रांतीदर्शी युगपुरुष तथा स्वातंत्र्य सैनिक राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव उद्यापासून श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमात सुरू होत असून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ यांनी या महोत्सवाची जय्यत तयारी केली असुन महासमाधी, महाद्वार व प्रार्थना मंदीर आकर्षक रोषणाईने परीसर उजळुन गेला आहे. या सात दिवसीय पुण्यतिथी महोत्सवात दररोज सामुदायिक ध्यान, सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन, ग्रामसफाई, प्रवचन, किर्तन संमेलन (गुरुकुंज वारी), भजन संध्या, अभंग गायन, खंजिरी भजन, योगासन शिबिर, वकृत्व स्पर्धा, ग्रामगीताचार्य पदवीदान समारंभ, कार्यकर्ता संमेलन, महिला मेळावा, आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर इत्यादी धार्मिक व विधायक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामधील सर्वात भावस्पर्शी व शिस्तबद्ध कार्यक्रम मौनश्रद्धांजली असून दि.११ ऑक्टोंबर २०२५ रोजी होत आहे. या मधे लाखो भाविक सहभागी



होतात तसेच विविध देशातील परदेशी नागरिक सुद्धा उपस्थित राहणार आहे. आज सकाळी ४ वाजता राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे पूजन करून या महोत्सवाची तीर्थस्थापना होणार आहे. सकाळी सामुदायिक ध्यानानंतर गुरुकुंज आश्रम व गुरुदेवनगरातून राष्ट्रसंतांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा निघणार आहे. यामध्ये विविध कलापथक सहभागी होणार आहे. या शोभायात्रेचे संचालन मानकर स्वामी, प्रशांत ठाकरे, सुधीर कडू व अमोल बांबल करणार आहे. सायंकाळी सामुदायिक प्रार्थनेवरील चिंतन ॲड. स्वप्निल महल्ले करणार असून रात्री ७.१५ ते ८.१५ वणी ममदापूर येथील भजनी मंडळ खंजिरी भजनाचा कार्यक्रम करतील. रात्री विजय माथने व सुवर्णाताई पिंपळकर यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. या सात दिवसीय कार्यक्रमात सामुदायिक ध्यानावर विठ्ठलदास काठोळे, सिमादिदि, ॲड. सचिन देव, विलास साबळे, ॲड. दिलीप कोहळे, सुश्री रामप्रियाजी, प्रकाश वाघ हे चिंतन व्यक्त करतील. तर सामुदायिक प्रार्थनेवर शिवाजी म्हैसने, पुष्पाताई बोंडे, डॉ.विकास बाहेकर, प्रा. अरविंद देशमुख, निलेश गावंडे हे चिंतन व्यक्त करतील. ग्रामगीता प्रवचनाकरिता नारायण रानोटकर, अंबिका विटोले, केशवदास भोंडे, हरिभाऊ वेरूळकर हे प्रवचन सादर करतील. कृष्णाई लांजूळकर, अनिल डवले, संकेत काळे, अशोक सुरडकर, कैलास महाराज, पंकज पोहोकार, प्रशांत ठाकरे, शुकदास गाडेकर, लक्ष्मणदास काळे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दि.०७ ऑक्टोंबर रोजी पुष्पाताई बोंडे यांच्या अध्यक्षतेखाली महिला संमेलन आयोजित केले असून डॉ. कमलताई गवई ह्या मार्गदर्शक असून डॉ. वसुंधरा बोंडे, आरती वानखडे, पौर्णिमा सवाई, गौरी देशमुख, प्रभा आवारे, सरपंच वैशाली धुमोणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दि.८ ऑक्टोंबर रोजी श्रीगुरुदेव वारकरी कीर्तन संमेलन (गुरुकुंज वारी) आयोजित केले असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मणदास काळे राहणार असून ज्ञानेश्वर वाघ या संमेलनाचे उद्घाटन करणार असून पदमाकर महाराज देशमुख, संदीप महाराज गिरे, इंजि.रमेश ढवळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दि.११ ऑक्टोंबर रोजी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ कार्यकर्ता संमेलन सत्कार व पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला असून सुधीरभाऊ मुनगंट्टीवार, सुरेंद्र भुयार, किर्तीकुमार भांगडीया, सर्वाधिकारी लक्ष्मण गमे हे मार्गदर्शन करणार आहे. दि. १२ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० ते १२ गोपालकाला व काल्याचे कीर्तन विशाल महाराज खोले करणार आहे. याकरिता राजेश्वर माऊली, जितेंद्रनाथ महाराज, सहायजी महाराज, नामदेव अंबाळकर, श्रीकृष्ण गिरीधर, अभिजीत बोके, नारायण अग्रवाल, शुक्ला महाराज, बाळासाहेब पावडे, रामचंद्र कांडलकर, बाबासाहेब बेनोडेकर, डॉ. अनिल सावरकर, आबा भोगे, वासुदेवानंद गिरी महाराज, मुनी पराशर, नाना महाराज, डॉ. विजय पर्वत यांना आमंत्रित केले आहे. दुपारी ३ ते ५:३० व्यायाम संमेलन व हनुमान प्रसारक मंडळ व्यायाम प्रात्यक्षिके सादर करतील. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, उपसर्वाधिकारी दामोदर पाटील राहणार असुन प्रमुख अतिथी डॉ. माधुरी चेंडके, क्रिडा अधिकारी, गणेश जाधव, सरपंच, सुरेंद्र भिवगडे, अनिल नागपूरे हे उपस्थित राहणार आहे. सायंकाळी ६ ते ७ सामुदायिक प्रार्थनेवर दामोदर पाटील चिंतन व्यक्त करून आभार प्रदर्शन करतील. रात्री ७:३० ते १० खंजेरी भजनाचा कार्यक्रम होणार असुन प्रकाश कथले, शंकर इंगळे, जगदेव सोनुले, निलेश इंगळे, शितल मांडवगडे, प्रविण हरणे, सागर भालचक्र, राम जोंधळे, अनुराग बाभुळकर व श्रीगुरुदेव भजन मंडळ, शेंदोळा खुर्द हे सहभागी होणार आहे.

# शहरातील कॅम्प परिसरात मादी बिबट्या पिल्लासह आढळली; नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शहरातील कॅम्प परिसरातील थॉमस चर्चजवळ एका मादी बिबट्या आपल्या पिल्लासह फिरताना दिसल्याची माहिती समोर आली आहे. सदर परिसर घन लोकवस्तीचा असून शाळाही याच भागात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असली, तरी वन विभाग, पोलिस आणि जिल्हा प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून





सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.

वन विभागाने नागरिकांसाठी विशेष सूचना जारी करत घाबरून न जाता काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा एकटे फिरणे टाळावे, लहान मुलांना एकटे घराबाहेर न सोडावे, व पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.बिबट्या दिसल्यास त्याला त्रास देऊ नये, दगडफेक किंवा हुसकावण्याचा प्रयत्न करू नये. तात्काळ १९२६ / ७७६८० ३८८८४ या वन विभागाच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा.शाळांनाही खबरदारी घेण्याचे निर्देश दिले असून, सत्तीचे मैदानावरील कार्यक्रम टाळणे, विद्यार्थी गटानेच हलवणे, व पालकांना वेळेवर माहिती देणे या सूचना देण्यात आल्या आहेत.घाबरू नका, अफवा पसरवू नका, असा स्पष्ट संदेश वन विभागाने दिला आहे.

# उद्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा श्री विजयादशमी उत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अमरावती महानगराचा श्री विजयादशमी उत्सव रविवार दि. ०५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजून ३० मिनिटांनी किरण नगर येथील श्रीमती नरसम्मा महाविद्यालयाच्या मैदानात आयोजित करण्यात आला आहे.हिंदू समाजातील पुरुषार्थ तथा शक्ती व पराक्रमाचा जागर



विजयादशमी उत्सवात होत असतो. यावर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पुर्ण होत आहेत.विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी स्वयंसेवक मागील अनेक दिवसांपासून तयारी करत आहेत.यंदाच्या विजयादशमी उत्सवात प्रमुख अतिथी म्हणून विपश्यना आचार्य डॉ. कमलताई गवई (आईसाहेब) संस्थापक अध्यक्ष श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती यांना सादर निमंत्रित केले आहे. आणि या उत्सवाला प्रमुख वक्ते म्हणून अ. भा. संयोजक प्रज्ञा प्रवाह , अ. भा. कार्यकारिणी सदस्य रा. स्व. संघ व जेष्ठ विचारवंत श्री. जे नंदकुमारजी हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही विजयादशमी उत्सवात दंड, नि:युद्ध , व्यायाम योग व घोषाचे प्रात्यक्षिक होणार आहे. उत्सवा पूर्वी सायं ५.०० वाजता पथसंचलन नरसम्मा महाविद्यालय येथून सुरू होऊन फरशी स्टॉप, कवर नगर, सबनीस प्लॉट मोतीनगर चौक किरण नगर – साई मंदिर मार्गे जाणार आहे.या कार्यक्रमाला अमरावतीकर नागरिकांनी सहपरिवार, इष्टमित्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन महानगर संघचालक श्री. उल्हासजी बपोरीकर यांनी केले आहे.

# मोर्शी येथे अखिल भारतीय संत्रा परिषदेची पूर्वतयारी बैठक उत्साहात संपन्न

## मोर्शी तालुक्यातून हजारो संत्रा उत्पादक शेतकरी होणार संत्रा परिषदेत सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ मोर्शी**

विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळून देण्यासाठी अखिल भारतीय संत्रा परिषदेच्या माध्यमातून संत्रा परिषदेचे आयोजन करून केंद्र व राज्य शासनाचे धोरण, पायाभूत सुविधा, संत्रा प्रक्रिया उद्योग, सत्राचे भावला संरक्षण, बाजारपेठ व निर्यात धोरण, अतिरिष्टीमुळे व विविध रोगांमुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, संत्रा व्यवस्थापन, शीतगृहे, यासह विविध विषयावर मंथन करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी १५ ऑक्टोबर २०२५ रोजी मातोश्री विमलताई देशमुख सभागृह अमरावती येथे महाराष्ट्र राज्य किसान सभा आयोजित अखिल भारतीय संत्रा परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या संदर्भात कृषी उत्पन्न बाजार समिती मोर्शी येथे अखिल भारतीय संत्रा परिषदेची पूर्वतयारी बैठक शेकडो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. विदर्भाचा फळाचा राजा संत्रा आंबड, गोळ, अविट चवीचे आरोग्य वर्धक फळ विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत परिवर्तन घडविणारे ठरले. शेतकरी आत्महत्यांकरीता प्रसिध्द असलेल्या अमरावती विभागात, 'संत्रा उत्पादक' शेतकरी पुर्वी आत्महत्या करीत नव्हता.




नजिकच्या काळात राजकीय, शासकिय, प्रशासकिय आणि संघटनात्मक अपयशामुळे संत्रा उत्पादक शेतकरी आत्महत्या करायला लागला आहे हि धोक्याची घंटा आहे. संत्रा वाचविला पाहिजे, उत्पादक शेतकरी वाचविला पाहीजे. वेळीच उपाय योजना करण्यासाठी, संघर्ष करणे परिस्थितीची गरज आहे.संत्रा उत्पादकांना दर्जेदार रोग मुक्त कलम, बागेचे नियोजन बध्द संगोपन, बागेचे पोषक तत्व व्यवस्थापन, उत्कृष्ट फळ उत्पादन व खात्रीची बाजारपेठ (देशांतर्गत / आंतरराष्ट्रीय) या प्रमुख गरजा पुर्ण करण्यासाठी पायाभुत सुविधा, संशोधित मार्गदर्शन, रचनात्मक संघटन यांची आवश्यकता असल्यामुळे संत्रा उत्पादक परिषद २०२५ च्या माध्यमांतुन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचे व्यासपिठ उपलब्ध करुन देण्याचा महाराष्ट्र राज्य किसान सभा आयोजित अखिल भारतीय संत्रा परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करीत असून मोठ्या बदलाचे दिशेने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवुन देण्यासाठी, हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी संत्रा परिषदेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य किसान सभेचे महासचिव अशोक सोनारकर यांनी केले.यावेळी संत्रा उत्पादक परिषदेमध्ये संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोरील आव्हाने आणि त्यांना येत असलेल्या अडचणी संदर्भात चर्चा व संवाद करून विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी पहिल्यांदाच व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले असून मोर्शी तालुक्यातून हजारो संत्रा उत्पादक शेतकरी अमरावती येथे होणाऱ्या संत्रा उत्पादक परिषदेमध्ये सहभागी होणार असल्याचा निर्धार व्यक्त केला यावेळी पूर्वतयारी बैठकीला स्वागत समितीचे अध्यक्ष साहेबराव विधळे, सचिव अशोक सोनलकर, संजय मंगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप रोडे, युवा उद्योजक नवीन पेठे, शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष रुपेश वाळके, प्रमोद दंडाळे, राजेंद्र घारड, गोपाल डहाके, रविकांत पाटील, बबनराव गांगडे, अश्विनी वानखडे, महादेव मानकर, संजय सुने, प्रशांत कांडलकर, अजय दातीर, श्याम वानखडे, संजय ठोके, गजानन चोपडे, सुधीर राऊत, यांच्यासह आदी संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# महसुली तंटे आता गावातच सुटणार ८४१ ग्रामपंचायतींमध्ये अंमलबजावणी सुरू

## तंटामुक्त ग्रामपंचायतींना मिळणार लाखोंचे पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ अमरावती**

गावोगावी होणारे महसुली तंटे थेट ग्रामपातळीवरच सोडवून ग्रामीण भागात सौहार्दाचे वातावरण निर्माण व्हावे, यासाठी राज्य सरकारतर्फे महसूल तंटामुक्त गाव अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत गावकऱ्यांच्या सहभागातून गावातील सर्व प्रकारचे

महसुली तंटे सोडविण्याकरिता ८४१ ग्रामपंचायतींमध्ये अहिल्यादेवी होळकर तंटामुक्त समित्या गठित करण्यात आल्या आहेत. या मोहिमेला प्रोत्साहन देण्यासाठी तंटामुक्त गावांना लाखोंच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.

शेतीचे वाद, यातून उद्भवणारे रस्त्याचे तंटे, धुरावाद आणि विविध प्रकारचे वाद वर्षानुवर्ष न्यायप्रविष्ट असतात. यातून वेळ आणि पैसा खर्च होत असताना मात्र यश मिळत नाही. परंतु, हे तंटे सामजस्याने मिटावेत याकरिता महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेच्या धर्तीवर आता महसूल तंटामुक्त गाव ही योजना शासनाच्या वतीने राबविली जात आहे. याअंतर्गत गावस्तरावरग्रामसभेतून तंटामुक्त समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्यात महसूल विभागाने या अभियानाला प्राधान्य देत महसूल तंटामुक्त गाव करण्याचा संकल्प केला आहे.

जिल्ह्यातील २०१७ गावांमधील महसूली तंटे सोडविण्याकरिता ८४१ ग्रामपंचायतींमध्ये समित्यांचे गठण करण्यात आले आहे. इतकेच नव्हे या अभियानाला प्रोत्साहन देण्याकरिता जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावर महसूल तंटामुक्त असलेल्या ग्रामपंचायतींना लाखोंच्या पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

# जिल्ह्यात आणेवारी ५६ पैशांवर दुष्काळी स्थिती नाही, शेतकऱ्यांमध्ये रोष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

सव्वालाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रातील पिके नष्ट झाली असून सप्टेंबरमधील पावसामुळे नुकसानग्रस्त क्षेत्र वाढणार असताना जिल्हा प्रशासनाने जिल्ह्याची नजरअंदाज आणेवारी पन्नास पैशांपेक्षा अधिक काढली आहे. या आणेवारीमुळे जिल्ह्यास दुष्काळी स्थितीतील मदत मिळण्यास अडचणी जाणार असल्याने शेतकऱ्याऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे जिल्हा प्रशासनाने सरासरी ५६ पैसे आणेवारी काढली आहे.जुलै व ऑगस्टमध्ये झालेल्या अतिवृष्टीने खरीप हंगामास चांगलाच तडाखा बसला आहे. जिल्हा प्रशासनाने केलेल्या संयुक्त पचनाम्यात एक लाख २३ हजार ७६३ हेक्टरमधील सोयाबीन, कापूस, तूर मूग, उडीद व मक्यासह संत्रा तसेच भाजीपाल्याचे पीक बाधित झाल्याचे म्हटले आहे. या क्षेत्रातील पिके पूर्णतः नष्ट झाली



आहेत. १ लाख ६८ हजार ५३३ शेतकऱ्यांना हा फटका बसला असून १०८.७१ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. सप्टेंबरमध्ये सतत झालेल्या पावसाने उर्वरित क्षेत्रातील पिकांना पोहोचली असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होणार आहे. यंदा खरीप हंगामातील उत्पादनाची सरासरी चागलीच पटण्याची शक्यता आहे.पावसाने झालेल्या नुकसानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नजअंदाज आणेवारी जाहीर केली आहे जिल्ह्याची आणेवारी सरासरी ५६ पैसे इतकी काढण्यात आली. सर्वात कमी आणेवारी धारणी तालुक्याची अन्नून ती ५२ पैसे आहे, तर भातकुली व मोर्शी तालुक्याची ६० पैसे आहे.जिल्ह्यातील चौदापैकी एकाही तालुक्यची आणेवारी पन्नाच पैशांपेक्षा कमी नसल्याने दुष्काळातील सवलतीपासून जिल्हा वंचित राहण्याची शक्यता आहे.अतिम आणेवारी काय निघेल, यावर ते अवलंबून असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने काढलेल्या नदरअंदाज आणेवारीवर शेतकऱ्यांनी चागलाच रोष व्यक्त केला.

**अशी आहे तालुकानिहाय आणेवारी (पैसे)**

धारणी-५२, भातकुली-६०. मोर्शी-६०, अचलपूर-५१, अंजनगावसुर्जी-५७. तिवसा-५७, चिखलदरा-५७. धामणगाव रेल्वे-५६. नांदगाव खंडेश्वर-५४, चांदूर रेल्वे-५४, अमरावती-५३. दर्यापूर-५३

# धारणीमध्ये आणखी एका मातेचा मृत्यू - परिसरात शोककळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४धारणी**

धारणी तालुक्यातील हरिसाल गावातील २० वर्षीय नवप्रसूता रुपाली अजय धांडे हिचा आज सकाळी उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.रुपाली सात महिन्यांची गर्भवती होती. काल उशिरा रात्री तिच्या घरीच प्रसूती झाली होती. दुर्दैवाने मृत बाळाचा जन्म झाला आणि त्यानंतरच तिची प्रकृती अचानक खालावली. तातडीने तिला धारणी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र उपचार सुरू असतानाच आज सकाळी रुपालीचा मृत्यू झाला. तिच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, कुटुंबावर दुहेरी दुःख कोसळले आहे.या घटनेमुळे ग्रामीण भागातील गरोदर मातांच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, आरोग्य यंत्रणेने तत्काळ लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत